# माझी आफ्रिकेची सफर

म. ग्रं. सं. टाणें
विषय प्र. प्रवास
सं. नं. १८०

★

REFBK-0007879

वासुदेव आ. देशप्रभु.

# माझी आफ्रिकेची सफर

वासुदेव आ. देशप्रभु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

REFBK 0007879

REFBK-0007879

नीलिमा प्रकाशन

[ सर्वाधिकार सुरक्षित ]

: मुद्रक व प्रकाशक :
**बाळकृष्ण दत्ताजी खडपे,**
नीलिमा प्रिंटिंग प्रेस,
४६ खोताची वाडी, मुंबई ४.



१ ली रांग : डावीकडून (१) पोर्तुगीज वसाहतींचे माजी प्रधान : डॉ. विएर माशाद (२) पोर्तुगीज रिपब्लिकचे अध्यक्ष : मार्शल कार्मोना (३) मूलसावचे गव्हर्नर (४) मोसांबिकचे माजी गव्हर्नर जनरल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
स्थळ प्रत

प्रवासाची अत्यंत आवड असणारे

माझे मित्र श्री. व्ही. डी. देसाई यांस—


वासुदेव आ. देशप्रभु.

# परिचय

माझें हें प्रवास-वर्णन अनेक अडचणीमुळें व त्यांतल्या त्यांत महायुद्ध सुरू होऊन कागदाच्या टंचाईमुळें छापून प्रसिद्ध व्हावयाचें तसेंच लांबणीवर पडलें; आज तें छापून वाचकांच्या हातांत पडत आहे याबद्दल मला आनंद वाटत आहे. माझ्या सफरींतील अमुकच विषय वाचकांस उपयोगी पडेल किंवा नाहीं याचा मी विचार करीत बसण्यापेक्षां प्रवास वर्णनांतील जें काय मी लिहिलें त्याचा वाचकांस हंसक्षीर न्यायानेंहि कां होईना, उपयोग झाला तरीहि मला संतोष वाटेल.

—वासुदेव आ. देशप्रभु,

शिष्टमंडळ



वा. आ. देशप्रभु. डॉ. फ्रोयलान. डॉ. फारु.

# माझी आफ्रिकेची सफर

कित्येक गोष्टी अकल्पितपणेंच घडून येतात. माझी आफ्रिका खंडांतील लोरेंस मार्क्‌ची सफर हीसुद्धां त्यांतलीच एक अकल्पित गोष्ट होय असें मी समजतों.

गोष्ट अशी झाली कीं, मला आगाऊ कांहींच कल्पना नसतां एके दिवशीं गोव्याच्या गव्हर्नर जनरल साहेबांची आपणांस भेटून जाण्याविषयीं तांतडीची तार आली. बाब निकडीची असली तरी ती स्थानिकच असावी अशी माझी कल्पना; म्हणून विशेष कांहीं विचार करीत न बसतां पेडण्याहून पणजीस निघून आलों. भेटींत मला बोलावण्याचें कारण गव्हर्नरसाहेबांनीं सांगितलें.

पोर्तुगीज साम्राज्याचे अध्यक्ष रिपब्लिकच्या स्थापनेपासून—म्हणजे जवळ जवळ तीस वर्षांच्या अवधींत–प्रथमतःच पोर्तुगीज वसाहतींना आपली भेट देण्यासाठीं निघाले होते; आणि त्यांचें पर्यटन पूर्व आफ्रिकेपर्यंत झाल्यावर मग हिंदुस्थानपर्यंत व्हावें असा बेत होता. परंतु दरम्यान युरोपांतील वातावरण कांहींसें बिघडल्यामुळें मूळचा बेत बदलावा लागला, व अध्यक्षांनीं हिंदुस्थानांत येण्याऐवजीं पोर्तुगीज हिंदुस्थानच्या वतीनें एक शिष्टमंडळ आफ्रिकेस जाऊन त्यानें तेथेंच अध्यक्षांचें स्वागत करावें, असा नवा कार्यक्रम ठरविण्यांत आला; व तो तितक्याच घाईनें अंमलांत आणणें अवश्य असल्यानें गव्हर्नरसाहेबांनीं मला व दुसऱ्या दोन शिष्टांना त्वरेनें पाचारण केलें होतें.

गव्हर्नरसाहेबांनीं ही सर्व हकीगत मला निवेदन करून, आफ्रिकेला पाठवावयाचें शिष्टमंडळहि आपण मुक्रर केलें असल्याचें व त्यांत माझा समावेश केल्याचें एकाच दमांत सांगून टाकलें; आणि आपल्या योजनेला मीं मान्यता द्यावी अशी आपली मनीषा व्यक्त केली. व मींहि माझी मान्यता चटकन् देऊन मोकळा झालों! एक तर फारसा विचार करण्याइतका तेव्हां अवधि नव्हता; दुसरें असें कीं, गव्हर्नरसाहेबांनीं स्वतः आमच्यावर व्यक्त केलेला

विश्वास दूर सारण्यास तसेंच कांहीं बलवत्तर कारणसुद्धां नव्हतें. शिवाय, तिसरी गोष्ट अशी कीं–आणि तीच सर्वांहून विशेष बलवत्तर–आमच्यांतील तारुण्य-सुलभ उत्साह अद्यापि ओसरला नव्हता! म्हणून एकाद्या लहानसहान प्रयाणाच्या वेळींहि आम्हीं जितका विचार करतों तितकादेखील करीत न बसतां या आफ्रिकेच्या दीर्घ पर्यटनाला आम्हीं अनुमति देऊन बसलों!

अनुमति दिली खरी; पण पणजी सोडून मोटार पेडण्याच्या रस्त्याला लाग-तांच मन एकदम कांकूं करूं लागलें! आपण थोडी घाई तर केली नाहीं ना, असें एकदां वाटे; तर गव्हर्नरसाहेबांच्या इच्छेला आपण मान्यता दिली हें योग्यच केलें, असेंहि दुसरें मन सांगू लागे; पण पुनः लगेच असा विचार मनांत येई कीं हें खंडांतराचें गंडांतर ओढवून घ्याच कशाला? आतां घरच्या मंडळीचें समाधान कसें करावयाचें? आफ्रिका म्हणजे मोझँबिक्. आणि मोझँबिक् म्हणजे जेथें गोव्याच्या गुन्हेगारांना जन्मठेपेच्या काळ्या पाण्याची शिक्षा भोगावयास पाठवितात तें ठिकाण, अशीच घरच्या मंडळीची आफ्रिकेविषयीं कल्पना! त्यांना आतां काय वाटेल? अशा तऱ्हेनें थेट पेडण्यांत येईपर्यंत मनांत एकसारखें विचारांचें काहूर माजून राहिलें, व त्या विचारांनीं प्रश्नोत्तरांची जणुं मालिकाच परस्पर चालू ठेवली होती!

पणजीहून मीं काय बातमी आणतों तें समजून घेण्यासाठीं मित्रमंडळी माझी वाटच पहात बसली होती. त्यांना घडलेली हकीगत सांगितली. तरी देखील मन जाग्यावर येईना. त्या मनाची स्वामिनी अद्यापि समोर आली नव्हती; आणि गव्हर्नरसाहेबांपेक्षांहि तिचा बोज राखणें प्राप्त! तेव्हां गव्हर्नरसाहेबांच्या तावडींतून सुटलों हें कांहींच नसून, खरा कसोटीचा प्रसंग तर पुढेंच आहे या विचारानें मनाची घाबरगुंडी उडून गेली होती!

मित्रमंडळीस निरोप देऊन मीं हळुहळू वाड्यांत प्रवेश केला, तों सौभाग्य-वती दिवाणखान्यांतच वाट पहात बसलेल्या! विचारांनीं माझ्या मुद्रेंत चल-बिचल झालेली पाहून मला माझा कोटसुद्धां काढण्याइतकी फुरसत न देतां, ‘आज इतके चिंतेंत कां?’ असा त्यांनीं प्रश्न केला. त्यावर जरा भीतभीतच पणजीच्या पॅलेसमध्यें गव्हर्नरसाहेबांपाशीं झालेलें बोलणें आम्हीं सौभाग्यवतींना

सांगितलें; आणि आतां इकडे काय उत्तर येतें त्याची वाट पहात आम्हीं राहिलों. पोषाख उतरणें चाललेंच होतें. एक मिनिट—दोन मिनिटें—तीन—चार; सौभाग्यवती तरीहि स्तब्ध उभ्या ! आम्हीं अगदीं काळ्या पाण्यावर जाणाऱ्या गुन्हेगाराप्रमाणें न्यायमूर्तींच्या तोंडाकडे निकालासाठीं पहात होतों ! शेवटीं एकदांची आकाशवाणी झाली, " शब्दच्च दिला असेल तर जावें—"


स्वामिनीची वाणी ऐकतांच्च एवढा वेळ विचारांच्या काहुरानें भणाणलेलें मन किंचित् ताळ्यावर आलें; कारण त्या वाणींत अद्यापि थोडीशी कुरकुर होतीच ! ती नित्याचीच हें मीं ओळखून चुकलों—ती म्हणजे देवाच्या प्रसादाची किंवा कौलाची ! पण वरच्या आकाशवाणीपुढें या प्रसादाची वा कौलाची फारशी क्षिति आम्हीं धरली नाहीं; पण सौभाग्यवतींना त्याचेंच महत्व फार ! त्या अगदींच जुन्या वळणाच्या जरी नसल्या तरी देवधर्म, व्रतवैकल्यें, पंचांग, सणवाण, तिथी, मुहूर्त, प्रसाद, भटजी, ज्योतिषी, शास्त्री इत्यादि इत्यादि गोष्टींत बऱ्याच गुरफटलेल्या आहेत. त्या बाबतींत आम्हीं कधींच त्यांच्या आड येत नाहीं; म्हणून या प्रसंगींसुद्धां देवाचा प्रसाद घ्यावा किंवा न घ्यावा, याबद्दल मीं कांहींच न बोलतां उगी राहिलों. मात्र त्या गोष्टी मला मनापासून नको होत्या; कारण देवाचा प्रसाद अनुकूल असा झाला नाहीं तर उत्साहानें अंगिकारलेला हा थोर मानाचा एवढा प्रवास व्यर्थ चुकवावा लागणार ! पण देव झाला तरी माणसाच्या उत्साहावर विरजण कधींच घालीत नसतो. देवाचा प्रसाद चांगलाच होणार अशी मला खात्री वाटूं लागली; आणि तो तसा चांगला झाला असें जेव्हां मागाहून पुजाऱ्यानें येऊन सौभाग्यवतींच्या कानावर घातलें, तेव्हां मात्र त्यांनीं मनःपूर्वक या आफ्रिकेच्या प्रवासास जाण्याची मला परवानगी दिली.

## आफ्रिकेस जातांना—

जून महिन्यांतील एका दिवशीं पांच वाजतां मंडळींचा निरोप घेऊन आम्ही आफ्रिकेच्या प्रवासास निघालों. मोठ्या सन्मानानें व मानाच्या कामासाठीं मी आफ्रिकेस जात होतों. तें कामहि लवकरच संपणारें असें होतें. तरी पण कुटुंबियांच्या प्रेमळ अंतःकरणाला तेवढा देखील वियोग दुःसह झाला. आपलें आवडतें माणूस क्षणभरसुद्धां दृष्टीआड होऊं नये या विचाराचा अनुभव कोणास नाहीं ? प्रत्येक लहानथोर व्यक्तीच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागले; तेव्हां माझ्याच अश्रूंना माघार घेण्यास मी कसें सांगूं ? आंत सौभाग्यवतीनें माझ्या हातावर कसाबसा मधुपर्क सोडला, आणि सद्‌गदीत अंतःकरणाच्या दृष्टिक्षेपानेंच आम्हांला त्यांनीं निरोप दिला व त्या आंत गेल्या; माझ्या दोन्हीं भगिनींनींहि तोच मार्ग धरला. आतां आपणांपाशीं कोणी नाहीं ही संधि पाहून मी मोटारींत बसलों व मोटार सुटली. वाटेंत म्हापशें येथें ‘ सारस्वत विद्यालया ’च्या इमारतींत आमच्या वऱ्याच मित्र-मंडळींनीं आम्हांस निरोप देण्याचा समारंभ जुळवून आणिला होता. त्यांत प्रामुख्यानें भाग घेणारे रा. केशव नाईक दलाल, सुब्राय नाटेकर, अनंत परशुराम प्रभू देसाई आणि नटवर्य रघुवीर सावकार यांचे व इतर मंडळीचे यथोचित आभार मानून आम्हीं त्याच दिवशीं पणजीस निघून आलों.

गोवा व आफ्रिका यांच्या दरम्यान वाहतूक करणाऱ्या बोटी उन्हाळ्यांत मुरगांव बंदरांतून जात असल्या तरी पावसाळ्यांत त्या थेट मुंबईहूनच जातात. त्यामुळें पावसाळ्यांत गोव्याहून आफ्रिकेस जाणाऱ्या उतारूंना बोट गांठण्यासाठीं मुंबईस जावें लागतें. आमच्या या प्रवासाचे दिवस जून महिन्याचे म्हणजे ऐन पावसाळ्याचे होते; तेव्हां आम्हांसहि मुंबईस जाणें भाग पडलें. आमच्या या बोटीचें नांव ‘ टायरिया ’ असें असून तिच्यावर आम्हां शिष्टमंडळांतील सभासदांसाठीं जागा राखून ठेविल्या होत्या.

## व्हायकौंट पार्क — पेडणें.



श्रीदत्त मंदिर    रामविलास पॅलेस    शारदाविलास पॅलेस

शिष्टमंडळांत तीन सभासद होते हें वर सांगितलें आहेच. हे तीन सभासद म्हणजे गोमांतकातील हिंदु, ख्रिश्चन व गोरे या त्रिवर्ग जनतेचे प्रतिनिधींच होत, असें बहुधा गव्हर्नरसाहेबांनीं योजलें असावें! त्यांपैकीं हिंदूंचा प्रतिनिधि म्हणून गव्हर्नरसाहेबांनीं आमची निवड केली होती. दोतोर फ्रोयलान व फारु हे दोघे अनुक्रमें गोमंतकीय ख्रिस्ती व गोरे यांचे प्रतिनिधि म्हणून निवडले गेले होते.

ते व मी, आणि आमच्याबरोबर आमचा भाचा व एक मदतनीस असे मिळून पांच जण जूनच्या ता. १९ रोजीं निघून रेल्वेनें मुंबईस जाणार होतों; पण पणजींत रात्रौं आगामी प्रवासाच्या कल्पनेनें मनाचा पगडा घेण्यास सुरवात केली. पणजी शहर डोळ्यांसमोर पसरलें असलें तरी मनःचक्षूंसमोर ‘ लोरेंस मार्क् ’ मधील देखावेच–अर्थात् वाचलेले–फिरकूं लागले! या एकाच विषयाच्या चर्चेंत रात्र केव्हांच निघून गेली. मडगांवीं जाऊन आगगाडी गांठण्यासाठीं पहाटेलाच उठावें लागलें. मोटारनें ‘ आक्षीची तर ’ गांठली, तेव्हां पुरते सहाहि वाजले नव्हते. सुप्रसन्न पहाटेची वेळ, गार हवा आणि झिमझिम पडत असलेला पाऊस, यांमुळें पंचवीस मैलांचें अंतर तुटून मडगांव स्टेशन केव्हां आलें तें कळलेंच नाहीं. येथेंसुद्धां कांहीं स्थानिक मित्रमंडळी व मित्रपरिवार आम्हांस निरोप देण्यासाठीं एकत्र जमला होता. आतां मात्र खरोखरच मायभूमीचा आपणांस वियोग होणार अशा संवेदना मनाला होऊं लागल्या. त्याचें दुसरें एक आनुषंगिक कारण असें होतें कीं, स्टेशनावर असाच निरोप देणारे व घेणारे अनेक लोक गाडीपाशीं गोळा झालेले होते. ते आमच्यासारखे केवळ शिष्टाईची तात्पुरती फेरी करण्यासाठीं आफ्रिकेला जाणारे नव्हते. ते तिकडे कायमचे आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठीं निघालेले होते! त्यांपैकीं पुष्कळांचा दुःखावेग अनावर झाला होता. बिचाऱ्यांना आपण आपल्या मायभूमीला पुन्हां कधीं, कसे येऊं, याचीच कल्पना करतां येत नव्हती.

पण असे अनेक जीव आफ्रिकेला जाऊन अनेक वर्षें तिकडे वास्तव्य करून परत आपल्या मायभूमीला आले आहेत. आणि तेहि चांगले सधन होऊन! पण काळाची ही फिरती दृष्टी अगोदर ओळखावयाची कशी? आफ्रिकेस

जाणारे हे लोक सर्वत्र ख्रिस्ती असतात. गोव्यांतील कोणीहि हिंदू पोटासाठीं आफ्रिकेला जात नाहीं. दोघांच्या जीवनक्रमांतील फरक हें याचें कारण आहे. ख्रिस्ती लोकांचा जीवनक्रम युरोपियन लोकांशीं जुळता असल्यामुळें त्यांना फिरंग्यांच्या संसर्गांत व सांनिध्यांत काळ कंठणें अवघड वाटत नाहीं. वस्तुतः आतां आफ्रिका खंडांत हिंदुस्थानांतील पुष्कळ हिंदु लोक प्रामुख्यानें नांदत असल्यामुळें गोव्याच्या हिंदूंना तेथें परकीपणा वाटण्याचें कांहीं कारण उरलेलें नाहीं. असो. असा विचार करीत करीतच व त्यांत स्वतःला विसरतच आम्हीं गाडींत चढलों. हळुहळू पोर्तुगीज सरहद्दीवरील 'कुळें' स्टेशन आलें. तिकडे पावसाचा जोरहि वाढूं लागला. सह्याद्रीचे आकाशाला भिडणारे उंच राक्षसी कडे, आपलीं हिरव्यागार वृक्षराजींचीं चिलखतें अंगावर चढवून अधिकाधिक निकट येऊं लागले, तसतसा आमचा अग्निरथ अधिकाधिक धिटाईनें त्यांजवर चाल करून जाऊं लागला! त्या रथाला मागून एक व पुढून एक अशीं दोन इंजिनें पुढें खेंचीत होतीं. त्यांचा तो अट्टाहास पाहून, पंचमहाभूतांच्या मदतीनें पंचमहाभूतांशींच अहर्निश चाललेला माणसाचा झगडा प्रत्ययास येऊं लागला! हां हां म्हणतां बोगद्यांतून व खिंडारांमधून वळसे घेणारी आमची गाडी दुध-सागराच्या वळणावर येऊन थडकली. पर्जन्याच्या अलोट पाण्यानें फुगलेला तो धबधबा खालीं खडकावर जाणूनबुजून कपाळमोक्ष करून घेत होता. त्याच्या या संवयीमुळेंच कीं काय, जगांतल्या एकाहि विमा कंपनीनें त्याच्या एरवीं दीर्घ असलेल्या आयुष्याचा विमा उतरण्याचें नाकारलें असावें! अशा विचारांत असतांना आमची गाडी 'कॅसलरॉक'ला येऊन पोंहचली.

येथून पुढच्या प्रवासांत मन रमणें कठिण होऊं लागलें. आतां केव्हां आफ्रि-केच्या बोटीवर चढूं अशी ओढ मनाला लागली होती. त्याच उत्कंठेंत दिवस-रात्र जाऊन आम्हीं तारीख २० रोजीं सकाळीं मुंबई गांठली. तारीख २१ रोजीं बोट सुटावयाची असल्यामुळें आमचा मुंबईंत एक दिवस मुक्काम झाला; तो दिवस अर्थातच केव्हां गेला तें कळलेंच नाहीं आणि अखेर निघण्याचा दिवस उजाडला.

★

## टायरिया—

आम्हीं सकाळीं दहा वाजतां धक्क्यावर गेलों. बोटीवर चढून सामान आपापल्या केबिनमध्यें ठेविलें व धक्क्यावर जमलेल्या मित्रमंडळीचा निरोप घेण्यासाठीं डेकवर उभे राहिलों. बोट शिटी वाजवून उतारू–बिनउतारूंना तयारीला लागण्याची सूचना देऊं लागली. बोटीचा नांगर उचलण्यास अर्धा तास असेल नसेल, एवढया अवधींत उतारूंना भेटण्याकरितां आलेल्या आप्तेष्ट मंडळींची एकसारखी ये–जा चालली होती. बोट सुटण्याची वेळ होत आली. कॅप्टननें इंजिनमास्तरास इंजिन चालू करण्याचा व इतर खलाशांना आपापली तयारी करण्याचा हुकूम सोडला. बिनउतारूंना खालीं उतरण्याची सूचना मिळाली. मित्र मित्रांस, आप्त आप्तांस हस्तांदोलन-पूर्वक निरोप देऊं घेऊं लागले. बायका–बहुतेक गौरकाय–सद्गदित अंतः-करणानें आपापल्या नवऱ्यांना चुंबनें व आलिंगनें देत देत " पुनरागमनायच " या अर्थाचे शब्द पुटपुटत, अश्रू ढाळीत होत्या, तर आईबाप आपापल्या मुलांना कवटाळून 'देव तुझें कल्याण करो', 'प्रवास सुखाचा होवो', असे उद्गार काढून, त्यांना मिठ्या मारून व त्यांचे मुके घेत त्यांना निरोप देत होते. अशा तऱ्हेचा हा हृदयस्पर्शी देखावा पाहून त्यानें आमच्याहि हृदयाला क्षणभर पूर आणला यांत नवल कसचें ?

पण तोहि क्षण गेला. आणि बोटीनें उतारू–बिनउतारूंना अखेरची शिटी ऐकवून, बिनउतारूंना लगबगीनें धक्क्यावर उतरविल्यावर धक्का सोडला व ती सागराभिमुख झाली. तेव्हां सारे उतारू–अर्थात् मीं व माझे दोन्ही सोबती हेही–गर्दी करून बोटीच्या प्रत्येक मजल्यावर चौफेर असलेल्या डेकवर गोळा झाले. प्रत्येकाचे डोळे किनाऱ्याकडे आपापल्या आप्तस्वकीयांना गर्दीतून ओळखून काढण्यांत गुंतले होते. आपल्या मंडळीची दृष्टादृष्ट होतांच हातांनीं निरोप देण्याची क्रिया एकसमयावच्छेदेंकरून चालू होई. हळुहळू किनारा दूर दूर सरत होता, माणसें लहान लहान होत होतीं व मग तीं अस्पष्ट झालीं. आणि मग

उतारूहि आपापल्या जागांकडे जाऊं लागले. पांचसात मिनिटांत शहर अगदींच अस्पष्ट झालें, तसा मींहि बोटीच्या निरीक्षणाला लागलों.

ही बोट म्हणजे एक चार पांच मजली, चोंहोंबाजूंनीं गॅलरी असलेला, तरता वाडाच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक मजल्यावर मध्यभागीं रांगेनें खोल्या, दालनें व दिवाणखाने होते. त्यांचीं दारें तुफानी वाऱ्यांपासून सुरक्षित रहाण्यासाठीं आंतील बाजूला उघडतील अशीं बसविलीं होतीं. अशा खोल्या अथवा केबिनी शेंकडों असून, त्यांचे पहिला व दुसरा असे वर्ग केलेले होते. पहिल्या व दुसऱ्या वर्गांत विशेष मोठासा फरक दिसला नाहीं. नाहीं म्हणावयास पहिल्या वर्गाच्या डेकवर जागा जरा ऐसपैस व फर्निचर विशेष आरामशीर होतें, एवढेंच.

या दोन्हीं वर्गांतून सहल केल्यावर मीं खालीं तिसऱ्या वर्गांत उतरलों. तेथील परिस्थिती अत्यंत निकृष्ट अशी मला आढळून आली. तेथें अर्थांत्‌च उतारूंसाठीं केबिनी अथवा खोल्या नव्हत्या. त्यांची सोय उघड्या डेकवर केलेली असते. 'डेक पॅसेंजर' अशीच त्या उतारूंना संज्ञा असते. पण या उतारूंची संख्या मुंबई ते मुंबासापर्यंत फार मोठी असते. वाटल्यास तीन रुपये भाडें देऊन त्यांस खाटलीं भाड्यानें मिळूं शकतात, एवढीच काय ती त्यांच्यासाठीं विशेष तरतूद केलेली असते. बाकी त्यांची डेक म्हणजे गुदामवजा समुद्रसपाटीची, घाणेरडी, संडास-मुऱ्यांना लागून असलेली जागा! या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची विशेष खर्च न करतांहि चांगली सोय करतां येणें शक्य आहे असें मला वाटलें; पण तिकडे लक्ष कोण पुरवितो? आफ्रिका व हिंदुस्थान यांच्या दरम्यान येजा करणाऱ्या उतारूंची एवढी मोठी संख्या या वर्गांतून असतांहि त्यांच्यासाठीं थोडा अधिक खर्च करून चांगली सोय बोटकंपनीनें करूं नये! बनियेगिरीची मजल कोणामध्यें व कोठवर जाऊं शकते, त्याची थोडीशी कल्पना आली. या समुद्रांत इतर राष्ट्रांच्या बोटींची वाहतूक नाहीं; अर्थात्‌ जी एक इंग्लिश कंपनी इकडे बोटींची वाहतूक करते तिलाच त्या वाहतुकीची एकमुखी मालकी मिळाल्यासारखी झाली आहे; हेंहि कारण या बेपर्वाईच्या मुळाशीं आहे.

आमच्या त्या जलप्रवासाची वेळ ऐन पावसाळ्याच्या मोसमाची असली तरी बोट किनाऱ्यालगत चाललेली होती; पण विशेष गटंगळ्या खात नव्हती. म्हणून त्या डेक पॅसेंजरांचे हाल तितकेच कमी वाटले. हा किनाऱ्याकिनाऱ्यानें जाण्याचा मार्ग बोटीला एकच दिवस चालावयाचा होता. बोट मुंबईहून निघाली ती थेट आफ्रिकेच्या म्हणजे पश्चिम दिशेला न वळतां उत्तरेकडे वळली; कारण हिंदुस्थानांत तिला अजून आणखी एक बंदर करावयाचें होतें. काठेवाडांतील जामनगरचें 'बेडी' हेंच तें बंदर होय. मुंबईहून निघाल्यावर बोट बेडी येथें दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं पोंहचली. बोट बंदरापासून दोन मैल बाहेर समुद्रांतच उभी राहिली होती. ती बंदराजवळ आंत गेली असती तर जामनगर पाहून घेण्याचा विचार होता. पण अवघ्या सहा तासांत दोन चार मैल समुद्रांत पडावांतून गटंगळ्या खाल्ल्यावर अखेर जामनगर पहाण्यास अवधि तो कितीसा मिळणार असा विचार करतां करतांच वेळ निघून गेला. जामनगरला जावें न जावें अशा विचारांतच मीं असतांना बोटीवर चढणाऱ्या उतारूंची सारखी वर्दळ चालू होती. या काठेवाडी बंदरांतून आफ्रिकेला जाणारे एवढे पॅसेंजर असतील अशी माझी कल्पना नव्हती. पण त्यांची संख्या सातशेंहून अधिक होती असें कळलें. एकाच बोटींत एकाच बंदरांतून जर इतकीं माणसें जात असतात तर सबंध वर्षांत सर्व बंदरांतून किती लाख माणसें येजा करीत असतील त्याची कल्पना येते; आणि त्यावरून ही वाहतूक करणारी एकमुखी मालकीची ही बोटकंपनी केवढी लूट मारीत असेल याचाहि अंदाज होतो. या लुटींत खुद्द हिंदी लोकांचा भाग कितीसा असेल तें कळत नाहीं; पण वास्तविक हक्कानें हा सगळा पैसा त्यांनाच मिळावयास पाहिजे; कारण उतारू किंवा माल यांच्या भाड्याच्या रूपानें कंपनीला मिळणारा पैसा सगळा हिंदुस्थानचाच !

बेडी बंदर जामसाहेबांच्या मालकीचें असलें तरी त्यावर ब्रिटीश सरकारचीच हुकमत चालते असें समजलें. मालकी हक्काबद्दल जामसाहेबांना ब्रिटीश सरकारकडून वार्षिक पांच लक्षांची रक्कम देण्यांत येत असते असेंहि समजलें.

बोट बेडी बंदराल्गत जातांना पुराण प्रसिद्ध द्वारकेचीं धूसर निळया रंगाचीं गोपुरें दिसतात.

तीं दिसतांच भगवान् द्वारकाधीश श्रीकृष्णाच्या संनिध आल्यासारखें वाटून मनांत भक्तीच्या आनंदोर्मि उसळूं लागल्या. येथें नास्तिकाचेंहि मस्तक नमस्कारा-करितां किंचित् लवल्याशिवाय रहात नाहीं. येथून पुढें मात्र थेट मुंबासापर्यंत बंदर तर नाहींच, पण किनाराहि दृष्टिपथांत येत नाहीं. हा प्रवास वर आकाश व खालीं पाणी अशा स्वरुपाचा पूर्ण दहा दिवसांचा आहे. या दिवसांत भोंवतीं अथांग महासागर आणि वर साभ्र वा निरभ्र आकाश या पलिकडे दुसरें कांहींच दृश्यमान् नसतें. बेडी बंदर सोडल्यावर लवकरच हा असा प्रलयकालीन उग्र देखावा! आतां आशिया कुठें व आफ्रिका तरी कुठें? कांहीं पत्ताच लागत नव्हता. आतां महासागराचें आक्षितिज वर्तुळ हेंच आमचें विश्व! आणि या अफाट विश्वांत आमची इवलीशी आठ हजार टनांची बोट!—तळयांत मुलें कागदी होडी पाण्यांत सोडतात तशीच भासूं लागली. त्यांत आणखी ती हालूं लागली! कारण आतां जोराचे पावसाळी वारे या अरबी समुद्रावर यथास्थित थैमान घालूं लागले होते. अशा या वाऱ्यांना आडवे कापीत बोटीला आपला पुढचा मार्ग आक्रमावयाचा होता; कारण तिचा रोख काठेवाडपासून मुंबासापर्यंत जातांना तीस-चाळीस अंश दक्षिणेकडे पण तिरवा होता, व वारे उत्तरेकडे पण तिरवेच वाहत होते. त्याचा परिणाम असा झाला कीं आमच्या अजस्र बोटीलाहि त्या प्रेक्षकहीन जलमैदानांत उदयशंकरलाहि अज्ञात असलेले हिंदी नृत्याचे अनेक अकल्पित प्रकार दाखविणें भाग पडलें!! त्यांतील फक्त चारच प्रकार काय ते आम्हीं स्पष्टपणें जाणूं शकलों. पहिल्यांत एकदां नाळेकडून तर एकदां सुकाणूकडून बोट उंचावत होती; दुसऱ्यांत एकदां डावी तर एकदां उजवी बाजू वर जाई; तिसऱ्यांत बोट मागेंपुढें किंवा वर खालीं न जातां जिथल्या तिथेंच हादरावयास लागे; तर चवथ्या प्रकारांत एकाद्या पर्वतप्राय लाटेवर एकदम वर चढून ती लगेच खालीं समुद्र सपाटींत फेंकली जाई. शेवटच्या दोन्हीं प्रकारांत उतारूंचा जीव कासावीस होऊन

जात होता! असें हें अद्भुत नृत्य मला बोट 'लागली' नाहीं म्हणूनच केवळ पहाण्यास मिळूं शकलें; पण या नृत्याच्या आरोहावरोहाबरोबर ज्यांचा जीव खालींवर होत होता त्या बिचाऱ्या उतारूंची काय दशा पहावी! माझ्या केबिनमधून मी वरच्या डेकवर, तेथून दुसऱ्या वर्गाच्या डेकवर व तेथून मग तिसऱ्या वर्गाच्या–डेक पॅसेंजरांच्या-डेकवर उतरून आलों. कारण या पॅसेंजरांची हालहवाल कशी काय असते ती पहाण्याची मला इच्छा होती; दुसरें एक कारण असें होतें कीं, आमचा मदतनीस पुंडलीक हाहि त्यांच्यामध्येंच होता. या डेकवर फिरतां फिरतां एके ठिकाणीं पिवळें पाणी वाहत असलेलें दिसून आलें. ह्या चमत्काराबद्दल चौकशी करतां असें कळलें कीं तो गुजराती लोकांच्या जेवणांत वापरण्यांत येणाऱ्या हळद मसाल्याचा परिणाम होता. त्यांना इतर तिखट मिठापेक्षां हळद जास्त लागते. त्यांनीं त्या मसाल्याचे डेकवर ठेवलेले पुडे समुद्रांतील लाटांचें पाणी डेकवर उसळून त्यानें उघळून लावले होते व आषाढ महिन्यांतच बोटीवर हळदमिश्रित पाण्याचा गोपालकाला आमच्या शागीर्द पुंडलीकासह इतर पॅसेंजरांनीं साजरा केला होता!

बोट जसजशी आफ्रिकेनजीक जाऊं लागली तसतशी लाटांची ही फाजील सलगी कमी होत गेली. पण तितक्याच दिवसांत हळद जशी जाग्यावर न रहातां समुद्र प्रवाहांत जमा होऊन गेली, तसेंच त्या हळदीचे मालकसुद्धां जाग्यावर रहातात कीं नाहीं अशी शंका वाटूं लागल्याशिवाय राहिली नाहीं. आमच्या पुंडलीकानें तर भक्तराज पुंडलीकावरहि मात करून आफ्रिका गांठण्यापूर्वींच मोक्ष खंड काबीज करण्याची तयारी केली होती असें आढळलें. काय ही डेक पॅसेंजराची स्थिती! व त्यांची ही स्थिती सुधारण्याचे उपाय कोणाला सुचूं नयेत व सुचले असले तरी ते अंमलांत आणण्याचें कोणीं मनांत आणूं नये याचें माझ्या मनाला मोठें नवल वाटलें!

★

## बोटीवरील जीवन—

समुद्र प्रवास सुखकर व्हावयासाठीं बोटीवरील जीवनाशीं समरस झाल्यावांचून भागणार नाहीं. बोटीवरील बहुसंख्य प्रवासी हिंदी किंवा हिंदू असले तरी त्यांचा भरणा तिसऱ्या वर्गांतच विशेष असल्यानें, वरच्या वर्गांतील उतारूंशीं त्यांचा विशेष संबंध येत नसतो. आणि वरच्या वर्गांतील उतारूंच्या जीवनावर एकंदरींत युरोपियन पद्धतीचा पगडाच जास्त दिसतो. जे कांहीं हिंदी प्रवासी वरच्या वर्गांत असतात तेहि पाश्चात्य पद्धतींचा तात्पुरता तरी अंगिकार करतात किंवा त्यांना तो करावाच लागतो. महात्मा गांधींसारख्या जगद्वंद्य विभूतीनें त्या आपल्या जुन्या दिवसांत कोणती पद्धति स्वीकारली होती तें समजत नाहीं; पण आज तरी मोठा संस्थानिक असो वा कोट्यावधीश असो, त्यानें बोटीवर प्रवासांत युरोपियन पद्धतीचा अंगिकार न केल्यास, त्याची इतर –व विशेषें करून युरोपियन–प्रवाशांकडून टिंगल अथवा उपहास झाल्याखेरीज रहाणार नाहीं. त्या पद्धतीच्या खांचाखोंचा जाणून आपणहि त्याच पद्धतीनें रुबाबांत राहूं लागलों तर आपला प्रवास सुखाचा करतां येतो हें सूत्र ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. या पद्धतीनें युरोपियन प्रवाशांवर व विशेषतः त्यांतील स्त्री वर्गांवर आपली छाप विशेष पडते. आणि त्या समाजांत मध्यम वर्गांचेंच प्राबल्य अधिक असल्यामुळें त्याचा परिणाम सर्वतोपरी इष्ट असाच होत असतो. म्हणून बोटीवरील प्रवासाच्या अवधींत युरोपियन पद्धति तिच्या सगळ्या गुणदोषांसह तात्पुरती तरी आत्मसात् केल्यावांचून गत्यंतर नसतें. त्याबाबतींत थोडेंहि दुर्लक्ष झाल्यास काय विचित्र परिणाम होतो त्याचें एक उदाहरण आमच्या नजरेस पडलें; तें जातां जातां येथें सांगतों.

आमची बोट मुंबासाला पोंहचल्यावर तेथें एक सिंधी जोडपें बोटीवर चढलें. त्यांच्याजवळ दुसऱ्या वर्गाच्या तिकिटा होत्या. पण दुसऱ्या वर्गाच्या सर्व जागा अगोदरच भरल्यामुळें त्यांना पहिल्या वर्गांतील अगदीं बाजूची एक

मोकळी केबिन देण्यांत आली. त्यामुळें कांहीं काल पहिल्या वर्गांतील सुख-सोयी त्यांना मिळत होत्या. त्यांपैकीं पाश्चात्य पद्धतीचा संडास ही एक होय. या संडासांना बैठकीवर एक चौकट असते. पाणी घेणाऱ्या हिंदी उतारूंनीं ही चौकट उचलून वर करणें इष्ट असतें; याची जाणीव त्यांना नव्हती. म्हणून त्यांच्याकडून ही चौकट पाण्यानें भिजली जात असे. हा गलिच्छपणा होय असें युरोपियन लोकांना किंवा इतरांनासुद्धां वाटल्याशिवाय कसें राहील ? असो.

असल्या कित्येक बारीकसारिक खांचाखोंचा समजून त्याप्रमाणें वागल्यास प्रवास सुखाचा होतो.

भाड्याच्या प्रमाणांत खाद्यपेयांचा व करमणुकीच्या साधनांचीहि सोय बोटींत थोडी फार केलेली असते. पहिल्या वर्गांतील प्रवाशांना तर रात्रौ नृत्य करण्याचीहि मोकळीक असते. आमच्या बोटीवर हा नाच रात्रीं खाना झाल्यावर जो सुरू होत असे तो मध्यरात्रपर्यंत चालत असे. मुंबासा बंदराच्या पुढें तर या नाचाला विशेषच रंग चढूं लागला. त्या बंदरांत गोऱ्या बोअर लोकांचीं अनेक जोडपीं जोन्हासबर्गकडे जाण्यासाठीं बोटीवर चढलीं. अशीं हीं जोडपीं या दोन ठिकाणांच्या दरम्यान केवळ चैनीखातर हरहमेश बोटीवर प्रवास करीत असतात असें कळलें. नाचाशिवाय इतरहि करमणुकीचीं साधनें बोटीवर असतात. कॅरम, ब्रिझीक इत्यादि बैठे खेळ असतात त्याचप्रमाणें पिंगपॉंग, रिंगटेनिससारखें व्यायामी खेळही असतात. या सर्व खेळांत स्त्रीपुरुष समान हक्कानें सहभागी होत असतात. केव्हां केव्हां खेळांचे सामनेहि लागतात व मग वेळ मोठ्या मजेंत जातो. शोकीन मंडळीसाठीं गायन वादन, ग्रामोफोन, पियानो इत्यादि साधनेंहि असतात व अनेक वेळां सिनेमांचीं चित्रेंहि दाखविण्यांत येतात. बोटीवर एक वाचनालयहि ठेवण्यांत आलेलें असतें. सारांश, वेळ जात नाहीं अशी कुरकुर कोणालाच करतां येणार नाहीं. निदान मला तरी ती करावी लागली नाहीं इतकें खरें.

अशाप्रकारं बोटीवर आमचा दिनक्रम चालला असतां आठ-दहा दिवस केव्हांच निघून गेले. आणि एके दिवशीं सकाळच्या प्रहरीं पश्चिम दिशेस समुद्र सपाटीखालीं कांहीं तरी छाया पसरल्यासारखा आम्हांस भास झाला. पण हा भास वारंवार होऊं लागल्यावर ही कांहीं आपली दृष्टिभूल नसून त्याला कांहींतरी कारण असावें अशी शंका आल्यानें आम्हीं कांहीं नाविकांना तिचें कारण विचारलें, तों ती जमीन जवळ आल्याची खूण होती असें त्यांनीं आम्हांस सांगितलें. या देखाव्याची मौज केवळ वर्णनें वाचून तितकीशी ध्यानांत येणार नाहीं. ही छाया दृग्गोचर होऊं लागल्यापासून जवळजवळ तिसऱ्या दिवशीं जमीन नजीक आल्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. यावरून इतक्या अगोदर होणारी ती छाया किती विस्मयकारक असेल त्याची कल्पना होऊं शकेल. जमीन जसजशी अधिकाधिक जवळ येऊं लागली तसतसे किनाऱ्यापासून फार दूर न जाणारे पक्षी दृश्यमान् होऊं लागले. डेकवरची मंडळी आपापल्या दुर्बिणी लावून त्या दिशेनें आणखीं टक लावून पाहूं लागली; हेतु हा कीं कोणाला तरी, कुठें तरी प्रत्यक्ष जमीन दिसेल! कोण ही पुन्हां जमीन नजरेला पडण्याची उत्कंठा! सतत दहा-बारा दिवस अफाट सागराच्या पृष्ठभागावर पाण्यावर तरंगत काढल्यावर केव्हां एकदां जमिनीला पाय लागेल असें व्हायचें हें साहजिक आहे. आणि याच उत्कंठेनें आमचे तास व प्रहरहि कसे भराभर निघून गेले! शेवटीं एकदां जमीन दिसूं लागली; त्याबरोबर सगळ्या उतारूंचे चेहरे कसे आनंदानें प्रफुल्ल झाले. एवढा हा आनंदाचा अनुभव घेण्यासाठीं तरी प्रत्येक माणसानें एकदां तरी जमीन सोडून दहाबारा दिवसांचा समुद्रप्रवास जरूर करावा.

आम्हांला दिसलेली ती जमीन म्हणजे आफ्रिकेंतील आमच्या बोटीच्या पहिल्या बंदराची जागा—मुंबासा बेट होय. हें बेट फार दुरून दृग्गोचर होऊं शकतें याचें कारण त्याच्या पलिकडच्या भागावरील तीन त्रिशूलाकृति शिखरें फार उंच आकाशांत जाऊन भिडतात हें होय. त्यांपैकीं मधलें शिखर सर्वांत

उंच असून तें हिरव्या गर्द वृक्षराजीनें इतकें शोभिवंत दिसतें कीं, त्यास ' मुंबासाचा मुकुट ' असें सार्थ नांव दिलें आहे. या मुकुटाच्या दिशेनें आमची बोट नजिक येत येत केव्हांच एका अरुंद अशा समुद्रांत शिरली. हा कालवेवजा समुद्र मुंबासा बेट व आफ्रिका खंड यांच्यामध्यें होता. तो आंत आंतच गेल्यामुळें तें बेट दक्षिणेकडून व उत्तरेकडून आफ्रिकेनें आंत घेतल्यासारखें झालें आहे. या चिमुकल्या तीन मैल लांब व दीड मैल रुंद बेटावर ' मुंबासा ' हें चाळीस पंचेचाळीस हजार लोकवस्तीचें व व्यापारी हालचालीचें शहर वसलें आहे. त्याच्या दक्षिणेकडच्या अरुंद सामुद्रधुनींतून बोट आंत जाऊन ' किलिंदिनी ' नामक बंदराला लागली; आणि आम्हीं जमिनिवर म्हणजे प्रत्यक्ष आफ्रिका खंडावर पाय ठेवला. एका नव्या खंडांत आपल्या आयुष्यांत प्रथमच पाय ठेवला या भावनेनें मनाला अत्यंत आनंद झाला !

★

## मोंबासा—

गोव्याच्या पश्चिमेकडे सरळ रेषेनें गेल्यास आपण आफ्रिकेला न पोंचतां अरबस्तानांत पोंचतों; आणि ह्यामुळेंच आमच्या समुद्राला ' अरबी समुद्र ' हें नांव पडलें आहे. मुंबासादि ठिकाणें तेथून खालीं दक्षिणेकडे राहतात. मुंबासा सिलोन बेटाच्या पश्चिमेकडे सरळ रेषेंतहि न येतां त्याच्याहि बरेंच दक्षिणेकडे येतें. आम्हीं जुलै महिन्याच्या आरंभीं तिकडे पोंहचलों, तेव्हां तेथें हिंवाळी हवा असून मुलूख जिकडेतिकडे हिरवागार दिसत होता. मुंबासा शहर तर विशेषच रमणीय दिसत होतें. ज्या भागांत बोट लागली तेथून शहराचा मुख्य भाग किंचित् दूर असल्यानें मोटारी व बसेस् यांची सारखी येजा चालू होती. बंदर फार गजबजलेलें दिसलें. धक्काही एकाच वेळां चार पांच बोटी लागूं शकतील इतका मोठा आहे. लोकांचा जमाव अनेकविध होता. त्यांत उतारूंची जेवणाखाणाची सोय करणारीं जीं स्थानिक उपहारगृहें होतीं, त्या प्रत्येक उपाहारगृहाच्या नांवाचा पट्टा गळ्यांत अडकवलेला एकेक शिपाई तेथें उपस्थित होता; जणूं चालतीबोलती, जिवंत जाहिरातच ! हे शिपाई आपापल्या उपहारगृहाच्या नांवाचीं कार्डें उतारूंना देत होते; व उतारूही त्यांना अनुसरून आपापली सोय करून घेत होते.

मुंबासा ही केनिया वसाहतींची राजधानी, तशीच व्यापारी मालाच्या चढ-उताराची मोठी पेठ आहे. येथें ' केनिया–उगांडा ' रेल्वे येऊन पोंहचली आहे. म्हणून आवकजावक सर्व मालाचें हेंच मोठें ठिकाण झालेलें आहे, व त्यामुळें येथें अनेक देशांचे व्यापारी ठाणें देऊन बसले आहेत. त्यांत हिंदी व्यापाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. तेथील लोकवस्तीच्या अदमासें निम्मे म्हणजे वीस बावीस हजार लोकवस्ती तिकडच्याच निग्रो लोकांची आहे; पण त्यांना तेथें कांहींच महत्व असलेलें दिसलें नाहीं. ते लोक केवळ मोलमजुरीवरच जगणारे दिसले. हिंदी लोकांची संख्या बारा हजारांवर आहे. त्यांत गुजराथी बनिये,

तसेच आगाखानी मुसलमान व बोहरीच जास्त! कांहीं थोडे शीखहि आहेत; त्यांना तिकडे ' सरदारजी ' म्हणून संबोधण्याचा प्रघात आहे. आगाखान यांनीं स्वपंथीयांच्या सोयीसाठीं तेथें एक दवाखाना, एक मुलींचें हायस्कूल, एक मुलांचें हायस्कूल अशा संस्था स्थापन करून चालविल्या आहेत. इतर हिंदी लोकांच्याहि शाळा, दवाखाने, सूतिकागृहें इत्यादि संस्था तेथें आहेत. बोहरी लोकांची एक व आगाखानी लोकांची एक अशा दोन मोठ्या माशिदी तिकडे दिसल्या. हिंदूंचेंहि एक देवालय दृष्टीस पडलें; तें ' किलिंदीनी रोड ' नांवाच्या हमरस्त्यावरच आहे.

एकंदरींत व्यापारी या दृष्टीनें येथें हिंदी लोकांचें महत्व तर दिसून येतेंच; पण त्यांची तेथें बरीच चलतीहि नजरेला पडली. त्यांच्या खालोखाल अरब लोकांचा क्रमांक लागेल असें वाटतें. त्यांची वस्ती सहा सात हजारपर्यंत असून ती बहुतेक जुन्या मुंबासांत आहे. मुंबासाचे हे जुना व नवा असे दोन भाग अगदींच भिन्न दिसतात. आणि माणसेंहि—विशेषतः बायका व मुलें—रंगी बेरंगी पोषाख केलेलीं, अरबी, हिंदी वा मिश्र दिसलीं. कित्येक रस्ते तर इतके अरुंद आहेत कीं त्यांच्यावरून चालणारा इसम आपले हात दोन्ही बाजूंना लांब करून चालूं लागेल तर ते दोन्ही बाजूंच्या घरांना सहजच लागतील! अरबी लोक फार प्राचीन काळापासून या प्रदेशांत वास्तव्य करीत असल्यामुळें, त्यांचा ' स्वाहिली ' वगैरे पूर्वकालीन स्थानिक जातींच्या लोकांशीं वर्ण-संकर होऊन अनेक मिश्र जाती आतां निर्माण झाल्या आहेत. हिंदी लोक तेथें पुष्कळ अलिकडच्या काळांत गेलेले असून ते भिन्न वर्णीयांशीं सहसा न मिसळणारे असल्यामुळें हिंदी लोकांमध्यें वर्णसंकराचा प्रकार झालेला दिसून आला नाहीं. युरोपियन लोक संख्येनें सर्वांत कमी—अदमासें एक हजारपर्यंत—असूनहि सत्तेच्या बळावर सर्वांवर आपला वरचष्मा त्यांनीं ठेवला आहे. हिंदी लोकांच्या बाबतींत तर त्यांचा द्वेषभाव व त्याला त्यांनीं दिलेलें वर्णविद्वेषाचें स्वरूप, हिंदुस्थानांत सर्वश्रुतच आहे. हिंदी लोक हिंदुस्थानांत बनलेलें रंगीत कापड व

इतर हरहुन्नर वस्तु अंतःप्रदेशांतील स्थानिक काळ्या लोकांना विकून त्यांच्या बदलीं त्या लोकांकडून हस्तिदंतादि मौल्यवान् वस्तु स्वस्तांत घेतात, हेंच युरोपियन लोकांना हिंदी लोकांचा हेवा वाटण्याचें मुख्य कारण होय; आणि म्हणून हिंदी लोकांच्या हालचालींवर, वसाहत करण्यावर व व्यापारावर त्यांनीं त्रासदायक निर्बंध घातलेले आहेत; व त्याविरुद्ध हिंदी लोकांचा अव्याहत झगडा चाललेला असतो. या झगड्याला महात्मा गांधींनीं आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त करून दिलेलें सर्वांना ठाऊकच आहे.

मुंबासांत गोव्यांतील ख्रिस्ती लोकहि हजार बाराशेंपर्यंत असतील. त्यांचा पेशा बहुतेक नोकरीचा आहे. कांहीं किरकोळ व्यापारहि ते करतात. पोर्तुगिजांनीं एका कालीं मुंबासावर शतक दीड शतकपर्यंत आपला करडा अंमल गाजविला होता. त्याची साक्ष त्यांचा ‘ जेझूस् ’ नांवाचा किल्ला अद्यापि देत आहे. ह्या किल्ल्याला जी ख्याति प्राप्त झाली आहे ती मुंबासाच्या इतिहासांत त्यानें भोगलेल्या वेढ्यावरून होय. वास्को-डी-गामाच्या कालापासून पोर्तुगीज लोक मुंबासावर आपली सत्ता स्थापन करूं पहात होते; व ती त्यांनीं थेट इ. स. १७३० पर्यंत अरबांशीं झगडत राहून गाजविलीहि. पण पुढें तो नाद त्यांना सोडावा लागला, व तें बेट अरबांनीं हस्तगत केलें. ते अरबहि आपापसांत लढतच असत. अरबांतील अंतर्गत यादवीचा फायदा घेऊन, व त्यांच्यावर गुलामांचा व्यापार करीत असल्याचा आरोप करून, इंग्रजांनीं तें बेट त्याच्या अंतर्भागासह आपल्या कबजांत घेतलें. तेथें इंग्रजांची सत्ता निर्वेधपणें स्थापन होऊन अद्यापि पन्नास वर्षेंसुद्धां लोटलीं नसतील; पण ती सत्ता तेथें आतां इतकी दृढमूल झालेली आहे व त्यांनीं त्या प्रदेशाला एवढें व्यापून टाकलेलें आहे कीं, पिढ्यान् पिढ्या तेच त्याचे मालक असावेत असें वाटतें! त्यांच्यापुढें अरब, हिंदी व निग्रो हे सगळे अगदींच हतबल झालेले दिसून येतात. अशा या मानवी झगड्याच्या भूमीवर निसर्गाचा मात्र वरदहस्त आहे असें दिसतें. तेथें झाडाझुडपांची, फळफळावळीची व पशुपक्ष्यांची समृद्धि दिसली. बहुविध पक्षी, रंगीबेरंगी अनेक

नों. नं. ......

जातींचीं मोठमोठीं फुलझाडें, आंबे, काजू, माड, ताड इत्यादि झाडांची जिकडे तिकडे गर्दीच गर्दी आहे.

‘ बावबा ’ नांवाचें एक विचित्र झाड पहिल्यानें येथेंच पाहिलें. या झाडाचें प्रचंड पण ठेंगू खोड व त्याच्या जाड पण विनपर्णी शाखा पाहिल्या कीं हा वृक्ष कोणी राक्षसानें मुळांतच उपटून ऊर्ध्वमूल करून पुरलेला तर नसेल ना, अशी क्षणभर शंका येते ! या वृक्षाच्या पोकळींत पावसाचें पाणी सांचून रहात असतें; व या पाण्याचा उपयोग तद्देशीय लोक उन्हाळ्यांत किंवा दुष्काळांत करीत असतात. केवढी ही विधात्याची देणगी ! पोर्तुगीज भाषेच्या क्रमिक पुस्तकांत या झाडाबद्दल एक धडा असलेला आठवला. मागाहून हें झाड मुंबईस राणीच्या बागेंत आम्हांस पहावयास मिळालें.

हीं झाडें व इतर अशाच अभिनव वृक्ष-वेली पहात आम्हीं पुन्हां धक्क्या-कडे आलों, व पुढील प्रवासाकरितां बोटीवर चढलों. जमिनीवर बरेंचसें फिरून आल्यामुळें पुनः दर्यावरील प्रवास करावयाला हुरूप आल्यासारखें वाटलें. बोटीवरील, व विशेषतः पहिल्या वर्गाच्या डेकवरील वातावरणहि उल्हसित दिसलें. पूर्वपरिचित तोंडवळे समोर झळकूं लागले; कोकिलस्वनी किलबिलाट कर्णरंध्रांत शिरूं लागला. हा गौरकाय युवतींचा तांडा बोटीवर चढून ‘ जोहान्स-बर्ग ’कडे जात असल्याची वार्ता आमच्या तैनातींतील माणसाकडून कळली. मागाहून कांहीं गौरकाय पुरुष मंडळीहि उतारूंत येऊन मिसळली. अशा प्रकारें मुबासा येथें रिकामी झालेली बोट निदान पहिल्या वर्गांत तरी पुन्हां भरून निघाली; पण त्यामुळें पुढील प्रवास मात्र अधिक मजेचा झाला.

आतां अरबी समुद्र उत्तरेला सोडून आम्हीं हिंदी महासागरांत गेल्यामुळें पावसाळी मोसमाचे तुफानी वारे मागें पडले होते. समुद्र शांत होता, व हवाहि गार, सुखस्पर्शी होती. त्यामुळें युरोपियन समाजांत नवचैतन्य उत्पन्न झालें होतें. उष्णकटिबंधांतून समशीतोष्ण किंवा शीतकटिबंधांत येऊन उतरल्याचा भास झाला. विषुववृत्तापासून पुष्कळ अंश दक्षिणेकडे आम्हीं चाललों होतों.

आणि उत्तर व दक्षिण कटिबंधांतील ऋतुमानांत दोन ध्रुवांचें अंतर असल्यामुळें, उत्तरेकडचा जो ग्रीष्म तेव्हां दक्षिणेकडे शरद् असा प्रकार होतो. अर्थात् आम्हीं केवळ पंधरा दिवसांच्या जलपर्यटनानें हिंदुस्थानांतील भर उन्हाळ्यांतून आतां दक्षिणेकडच्या हिवाळ्यांत येत होतों. मे, जून व जुलै हे मुंबासाच्या खालीं आफ्रिकेचे हिंवाळी महिने असतात. घड्याळाच्या तासांत येथपासून मोठा फरक पडलेला दिसून येतो.

मुंबासांतील या उमद्या, तरुण स्त्रीपुरुष समाजाच्या आगमनानें बोटीवरील वातावरण फारच आल्हादकारक झालें. पंपानें समुद्रांतील पाणी ओढून बोटीवर कृत्रिम तलाव बनविण्यांत आला. पोहण्याच्या कार्यक्रमांत स्त्रिया व पुरुष दोघेहि सहभागी होत असल्यामुळेंच कीं काय, थंडी असतांहि मंडळींची तिकडे सारखी ओढ लागलेली दिसली. जलक्रीडेला बराच रंग चढूं लागला. जलक्रीडा झाल्यावर ओलेतीं शरीरें वर येऊन सुखदायक सूर्य प्रकाशांत बागडत वाळूं लागलीं, तेव्हां "वस्त्रें भिजलीं जलधारांनीं, ऐशा ललना...."सारखीं पद्यें आठवल्यावांचून राहिलीं नाहींत.

यांत केवळ गंमतीचाच भाग आहे असें नसून आतपस्नानाचेंहि महत्व असतें. या हवेंत सूर्य प्रकाशाचा फारसा लाभ होत नाहीं. त्यामुळें दोन तीन आठवड्यांत कातडीवर एक प्रकारचे नायटे उठतात. त्यावर या समुद्रपाण्याच्या स्नानाचा व सूर्यस्नानाचा फार उपयोग होतो. शिवाय युरोपियन स्त्रियांना आपलीं शरिरें फिक्कट झालेलीं आवडत नाहींत. सूर्य प्रकाशानें तो फिक्कटपणा जातो व तीं टवटवीत व सांवळीं दिसूं लागतात.

पोहण्याशिवाय इतर शारीरिक व्यायामहि बोटीवर चालू होतो—रस्सीखेंच, लपंडाव, धांवण्याच्या शर्यती इत्यादि—त्यामुळें वेळ कसा व केव्हां जातो तें कळून येत नसतें. या खेळांत भाग घेणारे प्रवासी बहुतेक सर्व युरोपियनच असतात. त्यांत शिरूं इच्छिणाऱ्या पौर्वात्यांना पाश्चात्यांच्या चालीरिती व शिष्टाचार यांची पूर्णपणें माहिती असावी लागते. नाहीं तर त्यांच्या हातून

नकळत त्या युरोपियनांना असंमत व वाईट वाटेल अशी कृति घडण्याचा संभव असतो. तितकी खबरदारी घेतली तर निदान बोटीवर तरी काळागोरा असा भेद न रहातां सर्वांस एकोप्यानें व एकदिलानें एकमेकांशीं मिसळतां येऊन स्नेहवृद्धिहि होते. अशा स्नेहाचा अनुभव आम्हांला आमच्या इंग्रजी भाषेच्या मोडक्यातोडक्या सहाय्यानेंही बराचसा आला. यावरून हा प्रकार आपल्या वर्तणुकीवर बराचसा अवलंबून असतो अशी आमची खात्री झाली. शिष्टाचाराचीं सामान्य तंत्रें संभाळून वागणाऱ्यांची त्या समाजांत चहा होते; इतकेंच नव्हे तर ते सर्वांच्या आवडीचे होतात, असा आमचा ग्रह झाला.


अशा प्रकारें सर्वांची आनंदानें कालक्रमणा चालली असतां बोट झांझिबारला येऊन लागली.

★

## झांझिबार—

झांझिबार हें एक संस्थान असून तेंहि मुंबासासारखेंच एका बेटावर वसलें आहे. पण हें बेट मुंबासासारखें चिमुकलें नाहीं. त्याचा विस्तार सहाशें चाळीस चौरस मैल एवढा मोठा आहे. याची राजधानी झांझिबार बेटाच्या पश्चिमेस म्हणजे आफ्रिकेच्या बाजूला आहे. येथें बोट थेट धक्क्याला न लागतां बरीचशी बाहेर उभी राहिली. त्यामुळें लहान लहान स्टीम लॉंच मधून उतारूंची नेआण होऊं लागली. या लॉन्चेस् येथें पुष्कळ दिसल्या. नाविक सारे काळेच होते. या नाविकांचे त्या लहान बोटी चालविण्याचें कौशल्य वाखाणण्यासारखें होतें. समुद्र पुष्कळ उचंबळलेला असूनहि त्यांनीं त्या बोटी अशा कौशल्यानें चालविल्या होत्या, आणि विशेषतः अशा सफाईनें आणून धक्क्याला लावल्या कीं, आमच्या गोव्यांतील पणजी ते बेतींत चालणाऱ्या फेरी बोटीवरील धांदरट नाविकांची आठवण येऊन त्यांची कींव आल्यावांचून राहिली नाहीं.

झांझिबार संस्थान एका सुलतानाचें आहे. पण त्यावर ब्रिटिश सरकारचीच साम्राज्यसत्ता आहे. झांझिबारची लवंगांबद्दल मोठी प्रख्याति असून लवंगांचा एवढा मोठा व्यापार दुसरीकडे कोठेंच होत नाहीं. ह्या बेटावर लवंगांच्या ज्या बागा आहेत त्यांच्या विस्ताराची कल्पना येण्यासाठीं एवढेंच सांगतों कीं, अशा एका बागेमधून आम्हीं मोटारींतून सहल करावयास निघालों तेव्हां मोटार दोन-तीन मैल गेली तरी लवंगांची एक बाग संपलीच नव्हती. आमच्याकडे भिर्णांनीं ( कोकमाचीं झाडें ) गजबजलेलें एक मोठें रानच असावें तसा या बागेचा देखावा दिसत होता. ही बाग दुतर्फा असून तिच्यामधून एक सरळ सिमेंट कॉंक्रीटची सडक गेलेली होती. या सडकेवरून या लवंगांच्या बागेंतून, म्हणजे रानांतूनच म्हणाना, आमची मोटार जात असतांना फुललेल्या लवंगांचा मधुर सुगंध दरवळलेला होता.



झांजिबार शहराचा देखावा

येथील काळ्या लोकांना मुंबासाप्रमाणेंच 'स्वाहिली' हें नांव आहे. ही जात अरब व मुळचे काळे लोक यांच्या संकरानें बनलेली आहे. त्यांच्या अंगीं आळस अगदीं हाडींमासीं मुरलेला असावा असें दिसलें! अंगमेहनत करून पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळविण्याची त्यांना संवय नाहीं. कुठेंहि बसून आळसानें वेळ काढून बोट बंदरांत आली कीं कसेंहि आणा-दोन आणे हातावर पाडून घेणें इतकाच त्यांचा उद्योग! सर्वांच्या आधीं हे लोक आमच्या दृष्टीस पडले व म्हणूनच ते आमच्या विशेष लक्षांत राहूं शकले. आमची बोट समुद्रांत नांगर टाकते न टाकते तोंच पाण्यांतून चारी बाजूंनीं "आ ला लि आ लि ली टुप्पा" असा एकच कल्लोळ आमच्या कानावर आला. खालीं पाण्यांत पहातों तो जिकडेतिकडे हे स्वाहिली लोक पाण्यांत पोहत होते; व तोंडावाटे वर सांगितलेला आवाज करून बोटीवरील लोकांना पाण्यांत पै-पैसा टाकण्याविषयीं विनवीत होते! 'टुप्पा' म्हणजे 'टाका'! उतारूंनीं चवली पावली असें नाणें पाण्यांत फेंकलें कीं, या लोकांनीं तें नाणें तळाला जाण्यापूर्वींच पाण्यांत वरच्यावर पकडावें, व बोटीवरच्या उतारूंना थोडेसें चकीत करावें! ह्यांत त्यांच्या पोहण्याची चपळाई तर आहेच; पण त्यापेक्षां निसर्गाची मदतच त्यांना अधिक होते. या समुद्राचें पाणी येथें इतकें पारदर्शक आहे कीं अगदीं लहान वस्तु जरी पाण्यांत टाकली तरी ती पुष्कळ खालीं जाईपर्यंत बोटीवरील उतारूंनाही अगदीं स्पष्ट दिसत असे. ही पाण्याची अद्भुत पारदर्शकता दुसऱ्या कोठेंच आमच्या अनुभवास आली नाहीं. अशा तऱ्हेनें हे स्वाहिली लोक आम्हीं झांझिबार फिरून परत बोटीवर आलों तरी पाण्यांत डुंबून उतारूंची करमणूक करीत चवली पावली मिळवीतच होते.

खुद्द झांझिबार शहरांत आम्हीं बरेच हिंडलों. आमचा मुक्काम तेथील पोर्तुगीज कॉन्सलकडे होता. हे गृहस्थ आदरातिथ्य करण्यांत बरेच तत्पर दिसले. त्यांनीं आम्हांस धक्क्यावरूनच आमंत्रण दिलें होतें. आमचें दोन प्रहरचें जेवण त्यांच्या घरींच झालें; व मग त्यांनींच आपल्या मोटारींतून आम्हांला

शहरांतील व शहराबाहेरीलही शक्य तितकीं प्रेक्षणीय स्थळें दाखवून आणलें. त्यांतच वर उल्लेख केलेली लवंगांची बाग होती. संध्याकाळीं आम्हीं तेथील पदार्थ संग्रहालय पाहिलें; पण तें विशेष महत्वाचें वाटलें नाहीं. 'सुलतानाचा राजवाडा' आंत फिरून दाखविण्याची त्यांची फार मनीषा होती; पण बोट लवकर निघावयाची असल्यामुळें तें जमलें नाहीं.

राजवाड्यांत झांझिबारच्या 'सुलताना'चें वास्तव्य असतें. पण तो आतां फक्त नांवाचाच 'सुलतान' राहिलेला आहे. सुलतानाच्या हातांत सत्ता अशी कोणतीच नाहीं. ब्रिटिश सरकारकडून त्याला दहा हजार रुपयांचा मासिक तनखा मिळतो. सध्यांच्या सुलतानाच्या पूर्वींच्याच सुलतानानें आपली सत्ता सोडून दिली. सध्यांचा सुलतान हा त्याचा मेहुणा. ह्याला ब्रिटिशांनीं वस्त्रें देऊन 'सुलतान' बनविलें व बाह्यतः तरी तो सुलतान दिसतो. त्याच्या राजवाड्यावर शिपाई असतात; त्याला लांबलचक दाढी आहे; आणि त्या दाढीला शोभण्यासारखी पगडीहि पण आहे; सर्व कांहीं राजेशाही थाट आहे; पण अंदरकी बात म्हणजे दरमहा दहा हजार रुपये घेऊन गुपचूप बसावें, अशी त्याची परिस्थिती आहे. त्याला एक मुलगा असून त्याचें शिक्षण मायबाप सरकारच्या देखरेखीखालीं एका इंग्रजाकडून दिलें जातें. सुलतानाचा सेक्रेटरीसुद्धां एक इंग्रजच. जशी मुलावर तशीच बापावरहि इंग्रजांचीच देखरेख असावी अशी तरतूद दिसते. राजवाड्यांतील चीजवस्त वापरण्याची सुलतानाला मुभा आहे; पण त्याचें टिपण मात्र सार्वभौम सरकारपाशीं असतें. एकंदरींत इंग्रज सरकार या सुलतानाची फारच काळजी घेत असतें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

शहरांत सहल करीत असतांना आम्हीं तेथें गोव्याचे एक ख्रिस्ती गृहस्थ सरकारी कामगार आहेत, त्यांच्याकडे गेलों असतां या सुलतानाविषयीं गोष्ट निघाली. त्यानें आपल्या घराच्या मागची एक इमारत दाखविली व तेथें सुलतानाची दुसरी बायको रहात असल्याचें सांगितलें. या सुलतानाला दोनशें बायका नसून दोनच बायका आहेत. पहिली राजवाड्यांत रहाते व दुसरी येथें असते असें

तो म्हणाला. तिच्या भेटीसाठीं सुलतानाची स्वारी मधूनमधून तेथें येत असते असेंहि तो बोलला. ती पूर्वी पूर्व सुलतानाची भावजय होती. म्हणजे याच्या मेव्हण्याची बायको.

या सुलतानशाहींत इ. स. १८९२ सालीं मागच्या एका सुलतानामार्फत ब्रिटिशांनीं आपल्या सत्तेचा चंचुप्रवेश करून घेतला, तो फक्त न्यायदानाच्या हक्कापुरता तो हक्क विकत घेऊन, असें कळलें. पण पुढें दुसऱ्या एका सुलतानानें तो हक्क न मानतां आपण स्वतंत्र असल्याचा पुकारा केला, तेव्हां अर्थात् ब्रिटिश सरकारास आपल्या न्याय्य–हक्कांसाठीं लगेच त्याच्या वाड्या-वर तोफा डागणें न्यायतःच प्राप्त झालें. त्यामुळें त्या सुलतानाच्या जनान-खान्यांतील बेगमांची मुक्तता झाली; इतकेंच नव्हे तर जन्मांत ज्यांना बुरख्यामुळें सूर्यप्रकाश कधीं दिसला नव्हता, त्या या बेगमांना 'सूर्य कधींच मावळत नाहीं!' अशा साम्राज्याच्या राज्यांत गोषा झुगारून देऊन वाटेल तितकें सूर्यप्रकाशाचें सुख अनुभवण्यास मोकळें सोडण्यांत आलें! स्त्रीदाक्षि-ण्याचा इतका उदात्त असा दुसरा मासला मिळणें कठीण! वरील 'बिबी' ही त्यांपैकींच एक होती!

कांहींहि असलें तरी 'सुलतानशाही' मात्र ब्रिटिश सरकारनें कायम राखली आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सुलतानाची सत्ता गेली असली तरी 'सुलतान' हें नांव, त्याचें तख्त आणि त्याला लागणारा तनखा हें सर्व त्यांनीं चालू ठेवलें आहे.


झांझिबार शहर अद्यापि फार जुन्या स्थितींत व बहुतांशीं जुन्या अरबी पद्धतीचें आहे. दोन्ही बाजूंस चारचार मजली इमारती व मधून सिमेंट कॉंक्रीटची सडक असून ती फार अरुंद आहे. एका ठिकाणीं आम्हीं रस्त्यावरून चालत असतांना समोरून एक मोटार आली, तेव्हां मोठ्या शिकस्तीनें भिंतीलगत चिकटून राहून आम्हीं आमचा जीव बचावला. माझा तर श्वासोच्छ्वासही बंद झाला होता. मोटार दूर गेली तेव्हांच तो पुनः चालू झाला! कांहीं बोळांतून अगर बोळवजा

रस्त्यांवरून केवळ पादचारीच जाऊं शकतील. वहानांना तेथें शिरकावच नाहीं. कित्येक ठिकाणीं दोन्हीं बाजूंच्या इमारतींच्या गच्ची तर एकमेकांना जोडलेल्या दिसतात. तेथें एका घरांतील मुलें माणसें दुसऱ्या घरांत कदाचित् उड्या टाकून जातहि असतील. न्हाण्याधुण्याचीं भांडींहि तेथें समाईकच असलेलीं अशीं दिसलीं. संध्याकाळीं या गच्च्यांवर बायकांखेरीज माणसें आराम घेतांना दिसून आलीं. सकाळच्या प्रहरीं या गच्च्या रंगीबेरंगी गोपांनीं गजबजलेल्या दिसल्या. ही वेळ अरब स्त्रियांची भांडीं-कुंडीं धुण्याची असते.

दुसऱ्या कित्येक भागांची तुलना मुंबईतील कांहीं मुसलमान वस्तीच्या मोहल्यांशीं करतां येईल. एकाच बाबतींत मात्र त्यांमध्यें भिन्नता आहे. ती म्हणजे माणसें जुंपलेल्या गाड्यांची रांगच्या रांग ! या गाड्यांना ‘ रिक्षा ’ अशी संज्ञा आहे.

ही गाडी जनावरांऐवजीं माणूसच ओढीत नेत असतो. अशा एका रिक्षांत नाविन्यार्थ मीं चढलों; पण ती ओढणाऱ्या माणसाचें तें धापा टाकीत धांवणें सुरू झाल्याबरोबर मला शिसारी आली, व त्यांतून मी केव्हां खालीं उतरतों असें मला होऊन गेलें, व उतरल्यावरही किती तरी वेळ मानव्याची ही अवहेलना माझ्या मनांतून जाईना. या माणुस-गाड्यांचा सर्रास उपयोग हिंदुस्थानांतहि कांहीं ठिकाणीं केला जातो हें ध्यानांत आलें व माणसाला घोड्यांची वा बैलाची जागा घेण्याइतकी स्थिती यावी या विचारानें मला बेचैन केलें.

झांझिबार शहरांत गोव्याचे अनेक लोक नोकरपेशा पत्करून राहिले आहेत. त्यांतील कित्येक वरिष्ठ अधिकारांच्या जागांवरहि असल्याचें ऐकलें. परंतु त्यांच्यामध्यें एकीची भावना नसून परस्परांच्या चहाड्या आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यांत, किंवा गोंव्यांतील ग्रामीण भांडणें तिकडे भांडण्यांत त्यांच्या शक्तीचा बराच ऱ्हास होत असतो असें समजलें. त्याचा परिणाम असा होऊं लागला आहे कीं, हे लोक हळुहळू आपलें स्थान गमावूं लागले आहेत व तें पारशी लोक पटकावित आहेत. व्यापारी क्षेत्रांत हिंदुस्थानांतील पारशी, गुज-




झांझिबार येथील ' रिक्षा '

राथी, मारवाडी, मेमन, खोजे वगैरे लोकांचें प्राबल्य येथें फार दिसलें. सर्व दुकानांवर हीच मंडळी असलेली दिसली. या सर्व लोकांना 'मोंजे' असें स्थानिक नांव आहे. या शब्दाचा मूलार्थ काय तो आम्हांला समजून आला नाहीं, व कोणी सांगूं शकला नाहीं. परंतु ज्या लोकांना हें अभिधान लावलें जातें त्यांत बरेच कृपण मारवाडी, लबाड बनिये, ओंगळ भय्या व सर्वसाधारणपणें मालिन्याची कळा असलेले गुजराथी, बोहरा वगैरे लोक असल्यानें त्या अभिधानाला बराचसा वैगुण्ययुक्त अर्थ प्राप्त झालेला आहे, एवढें मात्र खरें. कार्पण्याच्या व मालिन्याच्या बाबतींत या लोकांची एकदां श्रीमति सरोजिनी नायडूंनीं स्पष्ट कानउघाडणी केली होती असेंहि समजलें. पण त्यानंतर पांच सात वर्षांनीं आम्हीं गेलों असतांही तेवढ्या दीर्घ अवधीनंतरही त्या कानउघाडणीचा कांहींच परिणाम त्यांच्यावर झाला होता असें आम्हांस दिसून आलें नाहीं. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट अशी कीं, ह्याच लोकांच्या तेथील स्त्रीवर्गाविषयीं त्रयस्थाचें फारच अनुकूल मत झाल्यावांचून रहात नाहीं. त्यांच्या निसर्गदत्त सौंदर्याला शोभेल असा नीटनेटकेपणा, निर्मळपणा, वेषभूषेंतील कलाभिरुचि इत्यादि हिंदी संस्कृतीचीं प्रतिकें आफ्रिकेंतहि कायम राहिलीं आहेत हें पाहून मनाला संतोष होतो. पुरुषवर्गानें इतकेंच केलें असतें तर ! पण नाहीं—त्यांच्यानें तें होणार नाहीं. व्यवसाय, द्रव्यलोभ कीं अज्ञान यांपैकीं याचें कोणतें कारण असूं शकेल ? पण हें अज्ञान म्हणा, वा हा द्रव्यलोभ म्हणा, त्यामुळें ते एवढें खंडांतर करून व्यापारी धडाडी दाखवूं शकतात हें तरी काय थोडें झालें ?

पण या लोकांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, त्यांना जर तेथील समाजाशीं टक्कर देऊन रहावयाचें असेल तर, त्यांनीं आपली रहाणी त्या समाजाइतकी तरी प्रगत करून घेतल्यावांचून भागणार नाहीं. पण हे लोक पैसा खर्च होईल या भीतीनें आठ आठ दिवसपर्यंत श्मश्रूहि करीत नसतात ! असलेच एक श्मश्रू वाढलेले, तेलकट कपड्यांचे 'मोंजे' आमच्या परिचयांत

आले. त्यांची तिजोरी पैशांनीं भरगच्च भरलेली असल्यामुळें लोक त्यांना मान देत असत; मीं त्यांस म्हटलें, "काय शेठजी, आपण हजामतीची ही हेळसांड जाणूनबुजून करतां, कीं इकडे हजामांचाच तुटवडा आहे?" त्यावर ते म्हणाले, "अहो, तेवार आले, शनिवार आले, तिथी आल्या, श्राद्ध आलें इ. इ." आम्हीं त्यांना विनोदानें म्हणालों, "तुम्हालाच तेवढे तिथीवार कां बाधतात बरें? तुमच्या रामाला आणि श्रीकृष्णाला रोज गुळगुळीत हजामत कशी करतां येत होती बरें? त्यांची वाढलेली दाढी तुम्हीं कधीं चित्रांत पाहिली आहे का?" त्यावर, "अहो, ते देव! त्यांना काय तिथी आणि वार बाधते?" असें म्हणून शेटजी हंसूं लागले. पण माझी खात्री आहे कीं, त्यावेळीं त्यांचें मन आठवड्यांत तीन हजामती टाकल्यामुळें महिन्याकांठीं किती शिलींग वांचले, व वर्षाला किती पौंडाची बचत त्यामुळें झाली, याचाच हिशोब करीत असलें पाहिजे!!

पूर्व आफ्रिकेंतील बहुतेक शहरें जरी हिंदी लोकांनीं गजबजलेलीं असलीं तरी तेथें अर्वाचीन युरोपियन पद्धतीच जुन्या पद्धतीची जागा झपाट्यानें घेत आहे; आणि तेथें राजकीय सत्ता युरोपियन लोकांच्याच हातीं असल्यामुळें युरोपियन संस्कृतीचाच प्रभाव जास्त असलेला दृष्टीस पडतो. म्हणून तिकडील हिंदी लोकांनीं त्यांच्याशीं टक्कर देण्यासाठीं त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करूनच आपलें सामर्थ्य वाढविणें योग्य होणार; परंतु हे "मोंजे" अति कंजुषपणानें दोन पैशांच्या स्वार्थासाठीं महिना महिनाभर आपले तेलकट कपडे धुणार नाहींत, वर्षानुवर्ष अंगास साबण लावून पहाणार नाहींत, आणि घामटपणानें स्वकीयांनासुद्धां नकोसे होतील; मग युरोपियन संस्कृति जवळ करणें तर दूरच राहिलें! ही वस्तुस्थिती आमच्या लोरेंस मार्कीसच्या मुक्कामांत आमच्या विशेषच प्रत्ययाला आली. म्हणून ती येथें मुद्दाम नमूद करणें भाग पडलें. तीच स्थिती इतर शहरांतसुद्धां आहे. त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट अशी कीं, त्यांची नवी पिढी हळूहळू सुधारत असून आपली रहाणी इष्ट दिशेनें बदलण्याचा प्रयत्न करीत आहे.

झांझिबारांत हस्तिदंती काम फारच सुबक होत असतें असें दिसलें. तें मुख्यत: तेथेंच केलें जातें. कांहीं हिंदुस्थानांतूनही करवून नेलें जातें. तसल्या कामाचीं दुकानें तेथें पुष्कळ असून त्या सुबक वस्तूंचीं व इतर मालाचीं दुकानें कांहीं व्यापाऱ्यांनीं तर आमच्या बोटीवरच बोट धक्क्यास लागतांच मांडलीं होतीं ! तो प्रकार एखाद्या जत्रेंत दुकानदार आपलीं दुकानें मांडतात तसा दिसला; आणि माल घेण्याकरितां त्यांच्याभोंवतीं उतारूंतील स्त्रीपुरुषांचा जो घोळका जमला होता, त्यानें तर बोटीला तात्पुरतें जत्रेंचेंच स्वरूप आलें होतें.

मी त्या बोटीवर आणलेल्या मालाच्या विक्रीकडे मुद्दाम लक्ष देऊन पाहिलें तों मला असें आढळून आलें कीं, जमिनीवरच्या तिप्पट किंमतीला तो माल उतारूंच्या गळ्यांत बांधण्यांत येत होता, व उतारूंहि—विशेषत: बायका—तो तसा अज्ञानानें बांधून घेत होत्या. तरी तेथेंहि लोंचटाशीं दुसरा एक लोंचट भेटून सहा पौंडाला सांगितलेली वस्तु दीड पौंडाला त्यानें मागितल्याचें मला दिसलेंच ! अर्थात् तीच त्या मालाची खरी किंमत होती, असें मला मागाहून शहरांतील बाजारांत आढळलें !

शहरांतील बाजारांतहि हा ठकबाजीचा प्रकार होत नाहीं असें नाहीं ! पण तो आमच्यासारख्या आड गिऱ्हाईकाच्या लक्षांत येऊं शकत नाही. गिऱ्हाईक लागोपाठ दोन चार दुकानांत किंमतीची खातरजमा करण्याकरितां चवकशी करतें व मीहि ती तशीच करून काय घ्यायचें तें घेत होतों ! पण मागाहून आमच्या यजमानाकडून आम्हांला असें कळलें, कीं एवढेंहि करून आम्हीं फसले हे गेलों होतोंच ! कारण हीं दुकानें निरनिराळीं असली तरी त्यांचा मालक एकच असतो; आणि त्यानें गिऱ्हाईक पाडण्याकरितां एकाऐवजीं अनेक दुकानें संभाळलेलीं असतात. किंमतीच्या मानानें कापडाचा माल मात्र आम्हाला झांझिबारच्या बाजारांत विशेष सवलतीचा वाटला. एका शांघाय सुटाला तेथें अवघे बारा शिलिंग पडले. त्या वेळच्या नाण्याच्या भावाप्रमाणें ही बरीच स्वस्ताई होय. म्हणून आम्हांला आमच्या तेथील परिचि-

तांनींहि कापड मालाखेरीज अन्य माल तेथें न घेतां दार-सलाम येथें घेणें चांगलें, तेथें येथल्यासारखी फसवेगिरी चालत नाहीं, असें बजावलें. अशा तऱ्हेनें झांझिबारची सहल आटोपून आम्हीं सायंकाळीं बोटीकडे वळलों. आमचे तेथील यजमान, म्हणजे पोर्तुगीज सरकारचे त्यावेळचे अॅक्टिंग कॉंसल हे फार सज्जन असून त्यांच्या पत्नीहि *प्रेमळ व आदरातिथ्य*शील असल्यामुळें आमची फारच उत्तम व्यवस्था झाली. निरोप घेतांना आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानिले.

*

## दार-इ-सलाम—

झांझिबारहून आमची बोट रात्रीं निघाली. आतां हवामान उत्तम असल्यानें प्रवास विशेष सुखकर होऊं लागला. बोटीवर मंडळीहि नवीन आणि उत्साही असल्यानें अनेक विषयांवर बोलणें होऊं लागलें. दारे सलाम हें बंदर झांझिबारनजीक, पण झांझिबारप्रमाणें बेटावर मात्र वसलेलें नाहीं; तें किनाऱ्यावर वसलेलें आहे. ज्या प्रदेशाची ही पूर्वी राजधानी होती, तो 'टांगानिका' प्रदेश १९१४ सालापूर्वी जर्मनीच्या ताब्यांत होता. महायुद्धाच्या तहानें तो इंग्लिशांनीं जर्मनीकडून बळकाविला, आणि आपल्या साम्राज्यास जोडिला. त्या महायुद्धांत बेल्जम, फ्रान्स इत्यादि दोस्त राष्ट्रांनीं हा प्रांत जिंकण्याकरितां इंग्रजांच्या बाजूनें खटपट केली होती, त्याचा बदला म्हणून त्याही राष्ट्रांना कांहीं भाग देण्यांत आला होता; परंतु बेल्जमला दिलेला प्रांत परत इंग्लिशांकडे आला, आणि बेल्जमच्या ताब्यांत अगदीं थोडासाच राहिला. त्या युद्धांत इतर राष्ट्रांना त्यांच्या खटपटीच्या मानानें मिळावयास पाहिजे होतें तेवढें न मिळतां फक्त ब्रिटिशांनी, कदाचित् अमेरिकेच्या सहाय्यानें, आपला तळीराम गार केला होता असें दुसऱ्या जागतिक महायुद्धानें दिसून आलें; तसें नसतें तर पहिल्या युद्धांत इंग्रजांचीं दोस्त असलेलीं राष्ट्रें आज तटस्थ किंवा इंग्रजांच्या विरुद्ध गेलीं नसतीं खास! त्यावेळचा जर्मनीचा पूर्व आफ्रिका व पश्चिम आफ्रिका मिळून जो मुलूख होता त्याचा आकार पोर्तुगीजांच्या आफ्रिकेंतील 'आंगोल व मुसांबिक' ह्या दोन्ही वसाहतींएवढा म्हणजे बराच मोठा होता हें उघड आहे. पहिल्या महायुद्धानंतर त्या मुलुखापैकीं 'कोमरुन'वर फ्रेंचांची, तर दक्षिणेकडील जर्मन पूर्व आफ्रिका व जर्मन पश्चिम आफ्रिका म्हणून संबोधल्या जाणाऱ्या मोठ्या टापूवर ब्रिटिशांची सत्ता आली. ह्या वांटणीविरुद्ध तत्कालीन युरोपियन राष्ट्रांत बराचसा असंतोष धुमसत होता; व जर्मनी तर आपल्याला सर्वस्वीं नागविल्याचेंच सांगत होता! असो.

दारे सलाम हें मागील दोन शहरांपेक्षां बरेंच मोठें दिसलें. रस्ते प्रशस्त व रुंद; त्यांचें मोठ्या प्रमाणावर डांबरीकरण करण्याची योजना स्पष्ट दिसत होती. परंतु रस्त्याच्या बाजूला पडलेलें खडीडांबर महिनेच्या महिने तसेंच भिजत पडल्याचें स्थानिक माणसांकडून कळलें. कदाचित् जर्मनीनें लढाईचें शिंग फुंकल्यामुळें खर्चाच्या भानगडीकडे लक्ष देऊन ब्रिटिशांनीं तें लांबणीवर टाकलें असावेसें वाटतें.

कांहीं जिन्नस दारेसलामला खरेदी करावे अशी जी आम्हांला सूचना मिळाल्याचें वर सांगितलें, तिला अनुसरून मी दारेसलामची पेठ फिरलों व तेथील कांहीं लोकांशीं बोललोंहि. त्यावरून या व्यापारी व्यवहारांत वरील फरक असण्याचें कारण माझ्या लक्षांत आलें. पूर्वी जर्मनीची सत्ता होती त्यावेळीं सरकार मालाच्या ज्या किंमती ठरवून देत असे, त्यांबरहुकुमच त्या व्यापाऱ्यांना माल विकावा लागे. त्यामुळें भरमसाट नफा उपटणें धोक्याचें, नव्हे अशक्यच, झालें होतें. पुढें ती सत्ता जाऊन तेथें ब्रिटिश अंमल चालू झाल्यावर ब्रिटिशांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें व्यापाराला भावनियंत्रणाचा लगाम राहिला नाहीं. कारण एक तर इंग्रज स्वतःच बडे व्यापारी असल्यानें तें नियंत्रण खुद्द त्यांनाच बाधलें असतें. दुसरें असें कीं, आपल्या नव्या राजवटींत धनिक व्यापारी वर्गाला खुष करण्याची अनायासें आलेली संधि वायां गेली असती. पण पुढें कांहीं बिनव्यापारी लोक या नव्या राजवटीस नांवें ठेवूं लागलेले आम्हांला आढळले. पूर्वी जर्मन सरकार एकाच ठिकाणीं एकाच प्रकारचीं दुकानें लोकांना उघडायला देत नसे; आज पाहिजे त्याला पाहिजे त्या ठिकाणीं पाहिजे तितकीं दुकानें उघडण्याची मुभा आहे. यांत कदाचित् झांझिबारप्रमाणेंच प्रकार होऊन गिऱ्हाईकांची फसवणूक होत असेलहि.

पूर्वी पोलिसांचा अंमलहि करडा होता; त्यांचा दरारा एवढा होता, कीं रस्त्यांत पडलेली चीजवस्तहि सहसा चोरीस न जातां पोलिसांमार्फत ज्याची त्याला आठ आठ दिवसांपलीकडेहि पोंचती झाल्याचीं उदाहरणें लोकांनी

सांगितलें. अलीकडे चोऱ्यांचें प्रमाण वाढत असून या चोऱ्या बहुधा घरचे चाकर लोकच करीत असतात. हे चाकर धंदेवाईक चोरांचे नातलग असतात. पूर्वीच्या अंमलांत चोरीला फार कडक शिक्षा दिली जाई; आज तशी कडक शिक्षा दिली जात नाहीं; हेंहि चोऱ्यांचें प्रमाण वाढण्याचें एक कारण आहे, असें पूर्वीच्या करड्या अंमलाच्या पक्षपात्यांचें म्हणणें दिसलें.

या शहराचा व्यापार सर्वसाधारणपणें हिंदी लोकांच्या हातांत आहे. परंतु इतर देशांच्या व्यापाऱ्यांना कांहीं बंदी होती असें नव्हे. त्यामुळें तेथें दर बोटीस जपानी, जर्मन इत्यादि व्यापारीहि येत असत असें कळलें; व तसे नाना तऱ्हेचा व्यापार करणारे देशोदेशींचे अनेक व्यापारी आम्हांस तेथें आढळलेहि. या प्रदेशांतून 'सायसल'—म्हणजे आमच्या इकडील अणशी-च्या ( अननस नव्हे ) झाडासारखें झाड, ज्याचा दोरा स्त्रिया इकडे मंगळ-सुत्राकरितां वापरतात तें—झाडाची फार निर्यात होते. यावरून आमच्या देशांत या झाडाची मोठ्या प्रमाणांत लागवड झाली तर निर्गत करावयाच्या एका नवीनच मालाची बाब आमच्या देशांतहि तयार होऊं शकेल असें वाटतें.

आमची बोट दारेसलामच्या धक्क्यास लागली तेव्हां रात्र होती, व दिवसाहि ती पुरा दिवस थांबली नाहीं; म्हणून तेथें विशेष पहाणें शक्य झालें नाहीं. या शहरांतहि आमचा मुक्काम तेथील पोर्तुगालचे कॉन्सल यांच्याकडेच होता. त्यांनीं आमचें आदरातिथ्य उत्तम प्रकारें केलें. त्याबद्दल त्यांचे आभार मानून आम्हीं बोटीवर चढलों. आतां बोट मोसांबिककडे म्हणजे पोर्तुगीज साम्राज्यां-तील वसाहतीकडे वळली; तेव्हां हा वेळपर्यंत आम्हीं जे परराज्यांत भ्रमण करीत होतों ते आतां स्वराज्यांत शिरणार असें वाटूं लागलें.

★

## मोसांबिक—

मोसांबिक ही पूर्व आफ्रिकेंतील पोर्तुगीजांची एक मोठी वसाहत आहे. या वसाहतींत त्याच नांवाचें एक लहानसें शहर असून, तशींच आणखीहि दोन तीन शहरें आहेत. दारे सलामवरून निघाल्यावर बोटीला प्रथमच जें शहर दृष्टीस पडतें तें मोसांबिक शहर तेथून तीनशें मैल लांब आहे. दारे सलामचा किनारा सुटतो न सुटतो तोंच मोसांबिकच्या निळ्याकाळ्या डोंगराच्या छाया दृष्टीस पडूं लागल्या. हळुहळू मोसांबिकचा किल्ला व त्याचा तटसुद्धां दृष्टिपथांत येऊं लागला. "हेंच तें मोसांबिक," असें लक्षांत येऊन मनाला किंचित् धडकी बसली ! इतर शहरें जवळ आल्यावर मनाला एक प्रकारचा आनंद होत असे. पण हें शहर जवळ आल्यावरसुद्धां डेकच्या कठड्याला चिकटून असलेल्या मला बोटीवरून उतरून तें पहावें अशी कांहीं इच्छा होईना. बराच वेळपर्यंत—निदान दोन तीन तास तरी–मी कठड्यास टेकून होतों; व तेथून तो किल्ला मीं पहात राहिलों होतों. मनांत नाना तऱ्हेचे विचार येत होते. सन १९१२ सालापासून—म्हणजे माझें वय बारा वर्षांचें होतें तेव्हांपासून–या किल्ल्याच्या नांवाची माझ्या मनांत एक प्रकारची धडकीच बसून राहिली होती. गोव्यांत त्यावेळीं 'राण्यांचें बंड' झालें होतें; व पोर्तुगीज गव्हर्नर डॉ. को. दे कोस्त यानें तें मोडून काढलें; तेव्हां त्या बंडांतील अपराध्यांना जन्मठेपेची शिक्षा देऊन याच किल्ल्यावर आणून ठेवण्यांत आलें होतें. त्यानंतरसुद्धां कित्येक गुन्हेगार येथें पाठविण्यांत येत असत. त्या बिचाऱ्यांची काय दशा झाली असेल असा विचार मनांत सारखा घोळत राहिल्यामुळें तो किल्ला प्रत्यक्ष जाऊन पहावा असें मनाला वाटेचना; आणि तशा मनःस्थितींतच मीं बोटीवर राहिलों. माझे दोघे सहकारी मात्र तेथें जाऊन आले. 'कसें आहे शहर ?' असें मीं त्यांस विचारलें तेव्हां 'ठीक आहे; लहानसेंच असलें तरी चांगलें टुमदार आहे' असें ते म्हणाले. आणि तितक्यांतच बोटीनें तें बंदर सोडण्याचा इशारा दिला; व लगेच बोट हाललीहि.

येथून दुसरें शहर जे ब्रैरा तें साधारणपणें ७०० मैल लांब आहे. तेथें पोंहचेपर्यंत आम्हांला तीन चार दिवस लागले. ब्रैरा शहर मोसांबिक कालव्यावर वसलेलें आहे. शहर फारच टुमदार दिसलें. लहान असलें तरी त्याची रचना अत्यंत प्रेक्षणीय झाली आहे. आणि नवीन नवीन होत असणाऱ्या सुधारणांमुळें त्याला फारच सुबकपणा आला आहे. बोट धक्क्यास न लागतां बरीच बाहेर उभी राहिली होती; त्यामुळें उतारूंची नेआण लहानशा बोटींतून केली जात होती. धक्क्यापर्यंतचा पाण्याचा भाग कालव्याचा असल्यामुळें संथ असावा अशी आमची कल्पना झाली व ती धक्क्याकडे जातांना खरी असल्याचें दिसून आलें; आम्हीं जणूं काय एकाद्या तळ्यांतूनच जात आहों असें वाटलें; परंतु परत फिरून येतांना आमचा तो तर्क सपशेल चुकीचा ठरला ! कारण त्यावेळीं तेंच पाणी समुद्राच्या पाण्यापेक्षांहि उचंबळ झालें होतें. हा कदाचित् अनियमीतपणें वहाणाऱ्या वाऱ्यांचाहि परिणाम असेल.

ब्रैरा शहराला तेथील लोरेंस मार्क्विसच्या खालोखाल महत्व देतात. त्याचें कारण तेथें दोन आगगाडीचे रस्ते येऊन बंदराला भिडतात हें होय. गोव्यांत जसें मुरगांव तसाच हा प्रकार आहे. शहर सुधारण्याची आंखणी अत्यंत व्यवस्थित रीतीनें करण्यांत आली आहे. याचें कारण आम्हांस असें सांगण्यांत आलें कीं, तेथें बऱ्याच मोठ्या ब्रिटिश कंपन्यांचीं ऑफिसें, डेपो वगैरे आहेत. लोरेंस मार्क्विसच्या सुधारणेलासुद्धां असेंच इंग्रजी कंपन्यांचें वास्तव्य कारण आहे, असें आम्हांला कांहीं स्थानिक गृहस्थांनीं सांगितलें.

आमची बोट या बंदरांत आठ-दहा तास उभी होती. तेवढ्या वेळांत जितकें पाहून घेतां येईल तेवढें घेतलें. त्यांतच आम्हांला बोटीवर 'काऊंट ऑफ आझवेद' यांनीं खान्याचें आमंत्रण दिलेलें होतें, त्यांत बराच वेळ निघून गेला. काऊंटसाहेबांनीं आमचा पाहुणचार चांगला केला; त्याबद्दल आम्हीं त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

शहराची लोकसंख्या चार-पांच हजार असावी असें समजलें. तेथील सर्व जातींचा व्यापार मुख्यतः हिंदी लोकांच्या हातीं आहे; व व्यापारी वर्गांत गुजराथ्यांचा भरणाच जास्त आहे.


*

## लोरेंस मार्क्विस—

बैराहून निघाल्यावर दोन दिवसांतच बोट लोरेंस मार्क्विसच्या आखातांत शिरली. इतिहासकालांत पोर्तुगीजांनीं जीं ठाणीं केलीं त्यांपैकींच लोरेंस मार्क्विस हें एक होय. पण आतां त्याला अत्यंत अर्वाचीन स्वरूप आलें आहे. राजधानी या दृष्टीनें मात्र तें शहर मध्यवर्ति स्थान नाहीं. तें मोसांबिक प्रांताच्या अगदीं दक्षिण टोंकाला वसलेलें आहे. तेथून पश्चिमेकडे केवळ चाळीस-पंचेचाळीस मैलांवरच पोर्तुगीज हद्द संपते, व ब्रिटिशांच्या दक्षिण आफ्रिकेला सुरवात होते. परंतु त्या कारणामुळेंच या शहराला इतकें महत्व आलें आहे, हेंहि तितकेंच खरें आहे; कारण ब्रिटिशांच्या ट्रान्सवाल आदिकरून सधन व विस्तीर्ण टापूला नजिक असलेलें याच्याइतकें दुसरें सोईस्कर बंदर नाहीं. ब्रिटिशांच्या सगळ्या अंतःप्रांताच्या व्यापाराची आयात-निर्यात याच बंदरांतून व्हावी लागते. आणि त्यामुळेंच या शहराला इतकें महत्व आलेलें आहे. या शहराच्या या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळें त्याच्यावर सत्ता कोणाची असावी याबद्दलहि पूर्वीं बराच वाद झालेला आहे. त्याचा निकाल स. १८७५ सालीं फ्रेंच रिपब्लिकच्या अध्यक्षांमार्फत होऊन त्याच्यावर पोर्तुगालचीच सत्ता कबूल करण्यांत आली. आणि मग तेव्हांपासूनच त्याच्या सुधारणेला व वाढीला सुरवात झाली. ही वाढ आतांपर्यंत अखंड चाललेली असून त्याच प्रमाणांत ती पुढेंहि चालू राहील. यासाठीं आतांपासूनच मोठमोठे नवेनवे रस्ते आंखून ठेवले जात आहेत. आमची बोट येथें आल्यावर आमचा समुद्र प्रवास एकदांचा संपला म्हणून हायसें वाटलें; व पुढील गोष्टींबद्दल उत्कंठा वाढूं लागली. 'ओळख देख ठेवा' असा ठराविक ठशाचा निरोप देत घेत आम्हीं हळुहळू सामानाची बांधाबांध करून सज्ज झालों, तों धक्क्यावर 'पोर्तुगीज हिंदुस्थान'च्या शिष्ट-मंडळाच्या स्वागतार्थ फारच मोठा जमाव जमलेला दिसला! त्या जमावानें आम्हां शिष्टत्रयांना पाहतांच शिष्टमंडळाच्या नांवानें जयजयकार केला. हा

प्रकार मात्र आम्हांला अनपेक्षित असाच होता; परंतु लोरेंस मार्क्विस येथें हजारों गोमांतकीय लोक-तसेंच इतर हिंदी लोकहि वास्तव्य करून असल्यामुळें, आणि आम्हीं सरकारतर्फे व सरकारी पाहुणे या नात्यानें आलों होतों व आमच्या येण्याला राजकीय महत्व होतें म्हणून तशाच थाटांत आमचें स्वागत झालें पाहिजे असा या लोकांनीं बेत करून आमच्या स्वागताची जंगी तयारी केली होती. त्याप्रमाणें आम्हीं बंदरावर उतरतांच आमची मिरवणूक काढण्यांत आली. बरोबर अनेक मोटारी, अनेक पादचारी असे मिळून हा जमाव तेथील नगरपालिकेच्या सभागृहांत जाईपर्यंत तास-दीड तास तरी अवधि लागला. वाटेंत शिष्टमंडळाच्या नांवानें, पोर्तुगालच्या नांवानें व गोव्याच्या नांवानें जयजयकार होतच होता. नगरपालिकेच्या सभागृहांत पोंचल्यावर नगराध्यक्षांनीं आमचें यथोचित शब्दांनीं स्वागत केलें. मागाहून शिष्टाचाराचीं भाषणें वगैरे होऊन हा समारंभ संपला, व आम्हीं आमच्या नियोजित निवासस्थानीं गेलों. स्वतः आमची तेथील जिनवाला नांवाच्या एका श्रीमंत पारशी गृहस्थाच्या घरीं राहण्याची व्यवस्था केली होती. हे गृहस्थ व त्यांचें कुटुंब यांनीं आमची बरदास्त उत्तम प्रकारें ठेवली. त्यांचा राहता वाडा भव्य असून राहणीहि उच्च थाटाची असल्यामुळें आमची बिलकूल कसलीच गैरसोय कधीं झाली नाहीं. यजमान व यजमानीणबाई यांनीं आमच्या सुखसोईकडे बारकाईनें अगदीं मातृपितृवत् लक्ष ठेवलें होतें; आणि जिनवालाबाईंची माझ्याविषयींची कळकळ पाहून खरोखरीच मला माझ्या मातोश्रीची आठवण झाली. त्यांचा कुमार केसस यानेंहि जणू काय भावाची काळजी वहावी अशा सहानुभूतीनें आम्हांला वागविलें. एकंदरींत या घरांतील मुक्कामांत आम्हांला अगदीं घरच्यासारखें वाटलें. त्याबद्दल या मंडळीचे आम्हीं कधींहि उतराई होऊं शकणार नाहीं; तसेंच त्यांच्या प्रेमळपणाची विस्मृतीहि आम्हांला कधीं होणार नाहीं.


लोरेंस मार्क्विसमध्यें आमचा मुक्काम तीन आठवडे होता. पैकीं पहिल्या आठवड्यांत पोर्तुगालचे अध्यक्षसाहेब येऊन पोंहचले नव्हते म्हणून आम्हांला



लोरेंस मार्क्विसमधील एक अॅव्हेन्यू

तेथील लोकांची व एकंदर शहराची माहिती करून घ्यावयास बरीच सवड मिळाली. शहर या दृष्टीनें लोरेंस मार्क्विस मोठें आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्याची लोकवस्ती पंचवीस हजारांच्या मानानें असावी. सबंध शहरांत मिळून पांच सात रस्ते आहेत. तेवढे फिरून आलें म्हणजे शहराची सगळी आंखणी संपते. एक दोन मोठे अव्हेन्यू आहेत. त्यांच्या दोन्ही बाजूंना बंगले असून ते फार शोभिवंत दिसतात. हे बंगले आणि इतर घरें बहुतेक एक दोन मजलीच आहेत. त्यामुळें या शहराची रचना साधारणपणें बंगलोर शहराप्रमाणें भासते. बागबगीचे व रस्ते प्रशस्त व अत्यंत स्वच्छ असे आहेत. या स्वच्छतेची कल्पना प्रत्यक्ष पाहिल्यावांचून येणेंच कठीण. मोटारींतून हिंडतांना हातांतील ओढून संपलेल्या सिगारेटचें थोटूकसुद्धां रस्त्यावर टाकण्यास जीवावर येई. मुंबईसारख्या शहरांतही नुसत्या पानपट्या खाऊन रस्त्यांत टाकलेल्या पिचकाऱ्यांची व रस्त्यांतील केरकचऱ्याची संवय असलेल्या प्रवाशाला आपण येथें प्रत्यक्ष नंदनवनांत आहोंत कीं काय, असें क्षणभर वाटल्याशिवाय खाचित राहणार नाहीं. या अप्रतिम स्वच्छतेवरून तेथील पोलिसांची दक्षताही प्रत्ययास येते; कारण हें काम पोलिसांचें आहे. अर्थात् मूलतः तिची जाणीव सर्वसाधारण जनतेंत असावी लागते हें उघडच आहे. मुंबईसारख्या अतिगर्दीच्या शहरांत पोलिसांना गाड्याघोड्यापासून व ट्रॅम मोटारींपासून माणसांचा जीव बचावण्याचीच कामगिरी बेसुमार होते; तेथें पानपिचकाऱ्यांकडे व विड्यांच्या थोटुकांकडे लक्ष देण्यास भाग पाडलें तरी शक्य कसें होणार ? इतकी कडक दक्षता लोरेंस मार्क्विससारख्या मर्यादित लोकसंख्येच्या व ऐसपैस फूटपाथ असलेल्या शहरांतच दाखविणें पोलिसांना शक्य आहे. मोठ्या शहरांतून स्वच्छतेची जाणीव लोकांच्या अंगींच भिनलेली असावयास पाहिजे. लोरेंस मार्क्विसची जनता बरीचशी गोरी व बाकीची गोऱ्या संस्कृतीचा पगडा बसलेली असल्यामुळें, त्यांचा स्वच्छतेकडे विशेष कटाक्ष असणें स्वाभाविक आहे. कायद्यानेंहि या पाश्चिमात्य संस्कृतीच्या पगड्याला हातभार लावलेला आहे. उदा-

हरणार्थ, लॉर्स मार्क्विसच्या रस्त्यांतून धोतर नेसून फिरण्याची मनाई आहे. चोळणेंच घातलें पाहिजे. एका अर्थानें तें गैर आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण बरेच लोक इतक्या गबाळपणानें धोतर नेसतात कीं, त्यांचें अंग झांकलें जाण्याऐवजीं तें उघडेंच रहातें असें म्हणावयास हरकत नाहीं. स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजांत असल्या धोतरांबद्दल संकोच वाटणें साहजिक होय. पेशवाई कालांत धोतरांवर अंगावर घालण्याचे अंगरखे बरेच लांब-निदान गुडघ्यापर्यंत पोंहचण्याइतके-असत. त्यावेळीं तें ठीक होतें. पण आज युरोपियन पद्धतीचा तोकडा कोट उपयोगांत येत असल्यामुळें बराच घोंटाळा माजतो! निदान चोळण्याखालीं युरोपियन वापरतात, तशी धोतराखालीं चड्डी तरी वापरून वर कोट पेहरला तर फारसें गैर दिसणार नाहीं. पण इतकी खटपट कोण करील? त्यापेक्षां सोपा मार्ग म्हणून तेथील पोलिस खात्यानें धोतरांनाच सरसहा बंदी केली आहे. परंतु पुरुषांना धोतराची बंदी व पाटलोणीची सक्ति असली तरी हिंदु स्त्रियांना साडीची बंदी व लहंग्याची सक्ति नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे; आणि ह्यांत आज तरी नवल वाटण्याचें कारण नाहीं; कारण खुद्द लंडन, पॅरीसपर्यंत सुद्धां साडीनें झग्यावर आपली सरशी केलेली आहे; आणि सौंदर्यात्मकतेंत आपण झग्याहून वरचढ आहों असें तिकडील कलावंतांकडून शिफारसपत्र मिळविलें आहे! एका मोठ्या संस्थेंत आम्हांला आजच्या 'हर एक्सलन्सी' सरोजिनी नायडूंचा त्या मार्गे तिकडे गेल्या होत्या तेव्हां घेतलेला फोटो लावलेला पाहण्यास मिळाला. तो अर्थात् साडीनलाच होता. निग्रो लोकांच्या स्त्रियांना मात्र झगा घालण्याची सक्ती कायद्यानें केलेली आहे. आणि त्याचें कारणहि उघडच आहे. तें हें कीं त्यांची मूळची साडी एवढी शिष्ट व सुंदर पेहरणीची नाहीं. पण त्या किंवा हिंदी किरिस्तांव स्त्रियाहि जर हिंदी पद्धतीची साडी पेहरतील तर चालणार नाहीं असें नाहीं. साडी नेसल्या तर निग्रो स्त्रिया कमी कुरुप दिसतील आणि किरिस्तांव स्त्रिया जास्तच खुलून दिसतील. आणि त्यांचा जो मिश्र जातीय स्त्री वर्ग आहे तो तर खुपसुरतच दिसेल! हा वर्ग



लोरेंस मार्किस येथील 'माचेल'

तेथें बराच आहे; कारण बरेचसे हिंदी व युरोपियन लोक निग्रो स्त्रियांच्या संगतींत राहतात. त्यांची संतति संमिश्र स्वरुपाची असते.

या शहरांत फिरण्याचें दुसरें सुख म्हणजे रस्त्यांत गर्दी कशी ती बिलकूल नाहीं; आणि कदाचित् असली तरी ती भासणें शक्य नाहीं. अति विस्तार दाखवायाचा झाला तर ' बारा हात रस्ता ' असें म्हणण्याचा प्रघात आहे. पण येथें तर नुसता फुटपाथच चोवीस हात रुंदीचा आढळला. मग रस्ते किती रुंद असतील त्याची कल्पनाच करावी. मग तेथें गर्दी कशाची ?

या शहरांत अद्यापि कांहीं जुनीं घरें आहेत. त्यांचा उत्कृष्ट नमुना म्हणजे धक्क्यावरील तिकीट आफिसें व केशकर्तनाचीं लांकडीं घरकुलें ! पण तींहि आतां हळुहळू संपुष्टांत येत चाललीं आहेत असें स्पष्ट दिसलें.

या रस्त्यांची आणि एकंदर शहररचनेची जी भव्यता माझ्या विशेष प्रत्ययाला आली ती, अध्यक्षांच्या मुक्कामाच्या अवधींत जी एक प्रादेशिक वस्तुप्रदर्शनाची आणि प्रादेशिक इतिहास दर्शनाची म्हणून लांबलचक मिरवणूक निघाली होती ती पहात असतांना. अध्यक्ष दुसऱ्या आठड्यांत आले. त्यांच्या आगमनानिमित्त जे थाटाचे समारंभ झाले त्यांचीं वर्णनें त्या वेळींच वर्तमानपत्रांतून येऊन गेलीं असल्यामुळें त्याविषयीं येथें कांहीं विशेष लिहावयाचें नाहीं; पण वर उल्लेखिलेल्या मिरवणुकीचा प्रवाशी या दृष्टीनें जो माझ्या मनावर परिणाम झाला तो कांहीं निराळाच होता. म्हणून तो माझ्या स्मृतिपटलावर विशेष उमटून राहिला. त्याचें वर्णन येथें देणें जरूरीचें आहे.

मिरवणुकीच्या आघाडीला पांचपन्नास निग्रो लोकांचा एक तांडा आपल्या त्या रानटी पोषाखांत सजून ढोल बडवीत चालला होता. त्यांच्यामागून अनेक स्थानिक इंडस्ट्रियल वस्तूंच्या प्रदर्शनांचे व ऐतिहासिक देखाव्यांचे गाडे चालले होते. पहिल्या गाड्यांत पोर्तुगिजांनीं आफ्रिकेच्या टोंकाला वळसा कसा घातला आणि जें तुफानांचें व म्हणून हालांचें भूशीर असें संबोधिलें जात होतें त्याचेंच ' आशेचें भूशीर ' असें कसें नामकरण केलें तें वस्तुप्रदर्शनानें दाखविलें होतें.

त्याच्या मागचे देखावे पोर्तुगीज भाषेंतील प्रसिद्ध काव्य जें 'लुजियदस' त्यांतून घेतलेले होते. तेही मनोरम वठले होते. त्यानंतर चालणाऱ्या गाड्यांवर कांहीसें हिडीस असें दृश्य होतें; त्यांत 'गुगुंजाव' नांवाच्या 'काळ्या' शत्रूला गोऱ्या शत्रूंनीं कसें ठार मारलें त्याचें वस्तु दर्शन छिन्नविछिन्न शरीर दाखवून केलें होतें. त्या शरिरासमोर त्याचेच आजचे जिवंत काळे जातभाई एका गोऱ्या सोंगासमोर फळें फुलें घेऊन त्याला वंदन करीत होते! त्यानंतरची प्रगति दाखविणारा प्रतिकें म्हणून काळ्या मोयांनीं खांद्यावर घेतलेलें व आंत गोरी स्त्री बसलेलें माचेल ( मेणा ) चाललें होतें. त्याच्यामागून काळ्या माणसांनीं ओढला जाणारा व आंत गोरा माणूस बसलेला रिक्षा चालला होता. त्यामागून खेचरांची गाडी, नंतर घोड्यांची गाडी, त्यामागून मोटार, नंतर आगगाडी व मग विमान अशा प्रकारें पुढील प्रगति दाखविलेली होती. त्या त्या वाहनांतून त्या त्या कालच्या प्रगतिदर्शक अनेक वस्तु व त्या समवेत हजारों लोकांचा जमाव, अशी ही मिरवणूक मोठी मासलेवाईक होती. ह्यांत मनावर कायमचा ठसा उमटून राहिलेलें दृश्य म्हणजे अध्यक्षांसमोर धान्याचे व अन्य पदार्थांचे गाडे येतांच त्यावरचे काळे लोक त्यांना जो मुजरा करीत होते आणि जे केविलवाणे ध्वनि काढून हातांची बोटें एकत्र करून जेवणाच्या अविर्भावानें तीं प्रथम पदार्थांकडे नेऊन नंतर आपल्या तोंडाकडे नेत होते तें! तुम्हीं आम्हांला अन्नाला लावलें हा त्यांतील एकंदर भावार्थ! हा आविर्भाव करतांना ते पोटाला हात काय लावीत, तोंडाजवळ काय नेत, अध्यक्षांच्या चेहऱ्याकडे टक लावून काय पहात--तें सगळें दृश्य अद्यापीहि नजरेसमोरून जात नाहीं! गरीब बिचारे! त्यांना जशी तालीम दिली होती तसेच ते वर्तन करीत होते! त्या बिचाऱ्यांच्या अज्ञानाचा व असहायतेचा असा फायदा घेणाऱ्यांच्या मनाची रचना कशा प्रकारची असेल याचा विचारसुद्धां करवत नाहीं!

मागील वर्णनांत जो आम्हीं काळ्या लोकांचा प्रकार वर्णिला आहे, त्यावरून तेथील सर्वच काळ्या लोकांच्या संस्कृतीची कल्पना बसविणें योग्य




'वेर्बेन' समारंभांतील झालेल्या नृत्यांत
भाग घेतलेले गोवानिज स्त्री-पुरुष

होणार नाहीं. तेथील कित्येक काळे स्त्रीपुरुष अगदीं नखशिखांत पाश्चात्य संस्कृतींत मुरलेले व नटलेले असे आहेत. त्यांनीं पोर्तुगीज संस्कृति आत्मसात् केली आहे. आणि त्यांत नवल नाहीं; किंवा विषादही वाटण्याचें कारण नाहीं. कारण तिकडील काळ्यांचा समाज सर्वसाधारणपणें संस्कृतिशून्य असा आहे. या संस्कृतिहीन स्थितींतून कोणत्याही कां होईना, पण संस्कृतीच्या मार्गावर मनुष्यप्राणी आला तर तें मानवी प्रगतीच्या दृष्टीनें इष्टच आहे. कालांतरानें त्याच संस्कृतीनें जागृत झालेले हे लोक आपल्या संख्याबलानें गोऱ्या लोकांवर मात करणार नाहींत, असें म्हणतां येणार नाहीं. पण त्याहिपेक्षां दुसरी संभाव्य गोष्ट म्हणजे त्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणांत चालत असलेल्या वर्ण संकरानें एक नवीनच प्रकारचा समाज निर्माण होऊन तो देश व्यापून टाकील. ही संमिश्र प्रजा आज तिकडे वाढत्या प्रमाणांत आहे. तिचे अनेक नमुने आम्हीं बारकाईनें पाहिले. "व्हेरबेन" म्हणून जो एक करमणुकीचा कार्यक्रम अध्यक्षांच्या मुक्कामांत करण्यांत आला, तो पाहण्यासाठीं असल्या बऱ्याच संमिश्र जातीच्या युवति आल्या होत्या. त्यापूर्वी तेथील एक चालक आमच्या परिचयाचे झाले होते. ते मला म्हणाले, "चला, तुम्हांला इंदियेच्या मुली दाखवितों." आम्हीं गेलों. पाहतों तो तेथें भरगच्च शृंगारलेल्या अशा डझनवारी तरुण मुली दिसल्या ! त्यांचे चेहरे पाहूं लागलों तों ते सगळे काळेसांवळे ! पण सगळे कलमी आंबे ! कोणाचें गाल, तर कोणाचे ओंठ, व कोणाचें कुरळे आंखूड केंस–एकूण सगळीं वर्णसंकराचीं मासलेवाईक बाहुलीं ! यजमानांनीं त्यांची ओळख करून दिली. "हा मारी सौज बारदेशवाली; ही आना कॉस्त पणजीवाली, ही पावला पेरैर साष्टीवाली" वगैरे वगैरे. ह्याचा अर्थ असा होता कीं ह्या साऱ्या मुली "सौज", "कॉस्त", "पेरैर" प्रभृति जे गोअन खिश्चन लोक तिकडे जाऊन राहिले, त्यांच्यापासून निग्रो बायांना झालेल्या होत्या. त्यांना त्यांच्या बापांनीं कायद्यानें 'पेरफिल्यार' म्हणजे पोसक्या करून घेतल्या व मग कायद्यानें त्यांना मुलीचे सगळे हक्क प्राप्त झाले. या जातीच्या

संततीची तिकडे झपाट्यानें भर पडत चाललेली आहे. त्यांत युरोपियनांपासून काळ्या स्त्रियांना झालेली संतति आहे; क्वचित् गोऱ्या स्त्रियांना काळ्या पुरुषांपासून झालेली संततीहि आहे; कारण हिंदी समाजांतील असूनहि पुरुष जर सुशिक्षीत वा सुस्थित असेल तर गोऱ्या युवति त्यांना वरतात; तशीच हिंदी, चिनी, अरब इत्यादि भिन्नभिन्न वर्गीय लोकांपासून काळ्या व गोऱ्या बायकांना झालेली संततीहि आहे. एकंदरींत निसर्ग कामदेवाच्या सहाय्यानें घडवून आणीत असलेली ही उत्क्रांति कोठवर पोंचून तिचा कालांतरानें तेथील एकंदर समाजावर काय परिणाम होईल तें सांगतां येत नाहीं. तरीपण हाच संमिश्र समाज शेवटीं तेथें बहुसंख्य व प्रबल होईल असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. या समाजांत एक चांगली गोष्ट आहे ती अशी कीं, त्यांच्यांत वर्णविद्वेषाचें निर्मूलन झालेलें असतें. कारण त्याला जन्मतःच दोन्ही वर्णांबद्दल व त्या दोन्ही वर्णांना त्याच्याबद्दल आपुलकी वाटूं लागते. उलटपक्षीं आफ्रिकेंतील दुसऱ्या एकजातीय समाजांत वर्णविद्वेषाचें कांहींना कांहीं तरी बीज असतेंच; मग तें इंग्रजांसारख्या कडव्या लोकांत अतिरेकाला गेलेलें असो, वा पोर्तुगीजांसारख्या मनमिळाऊ लोकांत अल्पस्वल्प असो. याचें एक उदाहरण आम्हांला याच मुक्कामांत व खुद्द रिपब्लिकच्या अध्यक्षांच्या समारंभाच्या कार्यक्रमांतच आढळून आलें तें येथें देतों.

अध्यक्षांच्या सत्कारसमारंभांत जे अनेक कार्यक्रम झाले, त्यांत गव्हर्नरांच्या वाड्यांत झालेला चहापानाचा एक समारंभ होता. अशा समारंभाला हा वेळपर्यंत हिंदी लोकांना आमंत्रण देण्याची प्रथा नव्हती, व तदनुसार त्या लोकांना वगळून निमंत्रणपत्रिका जाव्या असें ठरलें होतें. परंतु हा प्रकार आगाऊ अध्यक्षांच्या कानांवर गेल्यानें त्यांनीं त्याविरुद्ध आपला अभिप्राय प्रगट केला, एवढेंच नव्हे तर हा भेदाभेद न मानतां सर्व वर्गांतील श्रेष्ठ मंडळीला निमंत्रणें गेलीं पाहिजेत, असा त्यांनीं आग्रह धरल्याचेंहि आमच्या कानांवर आलें. त्याप्रमाणें काळे-गोरे सर्व शिष्ट लोक या समारंभाला हजर होते. त्यांत अर्थात् हिंदु, पारशी,



अध्यक्षांनी दिलेली पार्टी

मुसलमान इत्यादि सर्व प्रकारचे लोक होते. त्यांच्या आयुष्यांत त्यांना ही पहिलीच महापर्वणी होती ! त्यांपैकीं जो तो अध्यक्षांशीं हस्तांदोलन करण्याकरितां मोठ्या आतुरतेनें पुढें सरसावत होता. असो. या ठिकाणचें ह्या विषाचें बीज अध्यक्षांनीं तात्पुरतें तरी जाळून टाकलें ही सत्य गोष्ट होय.

पण वर्णभेदाचा हा कलह आफ्रिकेंत सर्वत्र असल्याचें मशहूर आहे. त्याचें तीव्र स्वरूप ब्रिटिश वसाहतींतून प्रकट होत असलें तरी पोर्तुगीज वसाहतींत तो अगदींच नाहीं असें नाहीं. त्याचीं कांहीं चिन्हें आज दिसूं लागलीं आहेत. त्यावरून तो कलह येथेंहि प्रगट स्वरूप धारण करणार असें दिसतें. कलहाचीं कारणें अनेक आहेत. पहिलें, शेजारच्या बोअरांचें व इंग्रजांचें उदाहरण. दुसरें आजवर जे पोर्तुगीज लोक तेथें आले ते राज्यकर्ते या नात्यानें आले खरे, परंतु आतां—किंबहुना गेल्या पन्नास वर्षांपासून पोर्तुगीज लोक तेथें उद्योगधंदा, कारखाने, जमिनदारी वगैरे करून स्थायिक होण्यासाठीं येत आहेत; अर्थात् त्यांच्यांत आपलें कुटुंब, आपली जमीन, अशी भावना उत्पन्न होऊं लागली आहे. पोर्तुगालांत त्यांना जें समाजसुख आहे, तेंच येथेंहि पाहिजे असतें. त्याकरितां त्यांना येथें जी वसाहत व्हावयाची ती सर्वस्वी पोर्तुगालच्या एखाद्या तुकड्यासारखी व्हावी असें वाटतें. पण तें त्या तुकड्यांत अठरा पगड जातीचे, वर्णाचे, राहणीचे, भाषांचे आणि वेषांचे लोक भरल्यास कसें शक्य आहे असा प्रश्न त्यांना पडतो. व त्याकरतां त्यांना आतांपासूनच काळजी वाटूं लागली असून त्यासंबंधी त्यांचा विचार चालू आहे. हिंदी व्यापारी किंवा तत्सम धंद्यांत असलेल्या कित्येक लोकांपेक्षां तत्प्रांतीय काळ्या लोकांकडे त्यांची सहानुभूति विशेष आहे असेंच वाटलें.

तेव्हां पोर्तुगीजांसाठीं निराळाच स्वतंत्र भाग असावा असें वाटून इतरांस दूर करण्याकडे त्यांची बुद्धि झुकत आहे. कर्मधर्मसंयोगानें येथील हवामान व पोर्तुगालचें हवामान जवळ जवळ समान आहे. त्यांतल्या त्यांत लोरेंस मार्क्विस जर किंचित् उष्ण असेल, तर तें हिंवाळ्यांत इष्टच. या कारणानें अनेक पोर्तु-

गीज लोक आतां येथें येऊन येथील गोऱ्या लोकांची संख्या वाढवीत आहेत. अर्थात् जे हिंदी लोक तेथें जाऊन राहिले आहेत, त्यांना इतःपर एकजुटीनें वागून आपलें स्थान संभाळावें लागणार.

अशी एकजूट आम्हांला तेथील गोमंतकीयांत तरी अनुभवाला आली नाहीं, हें दुर्दैव होय. हे गोवेंकर सर्वच्या सर्वच खिस्ती आहेत हें खरें. पण गोमंतकीय खिस्ती हा सामान्यतः मूळचा फारसा सुसंस्कृत व प्रगल्भ विचारांचा असत नाहीं. तो जाईल तिकडे आपल्याबरोबर आपले गांवतंटे व जातबखेडे घेऊन जातो. त्यांच्यापैकीं जे कांहीं थोडेसे सुसंस्कृत व उच्च विचारांचे असतात ते इतरांना जवळ करीत नाहींत. त्यांनीं बहुतकरून पोर्तुगीज संस्कृति आत्मसात् केलेली असते; त्यामुळें ते पोर्तुगीज लोकांशींच जास्त समरस होतात–किंबहुना ते इतके पुढारलेले असतात कीं विवाहादि संबंध जोडावयाचा झाला तर ते पोर्तुगीजांशींच जोडण्याचा प्रयत्न करतील व पसंत तर करतातच. त्यांची संतति सर्वस्वी पोर्तुगीज गोऱ्यांतच समाविष्ट होत जाते. ही तेथील गोंवेकर खिस्ती समाजाची मोठी हानी होय यांत शंका नाहीं. हिंदु संस्कृतींतील व्यक्तींनीं युरोपियन बायका केल्याचीं अनेक उदाहरणें हिंदुस्थानांत आहेत; पण त्यांच्या संततीवर हिंदी संस्कृतीची छाप पडते; तसा प्रकार गोवेकर खिस्ती व पोर्तुगीज यांच्या संबंधांत घडून येणें शक्य नाहीं; व म्हणून त्यांची संतति 'देसेंदेंत' अथवा पोर्तुगीज वंशीय या वर्गांत मोडतात.

तेथील खुद्द पोर्तुगीज–म्हणजे गोऱ्या व अर्थात् चांगल्या उच्च वर्गांतील पोर्तुगीज–लोकांनीं हिंदी गोंवेकर खिस्त्यांपैकीं एकाद्या मुलीशीं लग्न केल्याचें उदाहरण मला आढळून आलें नाहीं. हे गोरे लोक व विशेषतः त्यांतील तरुण वर्ग गोंवेकर खिस्ती स्त्रियांची शारीरिक सौंदर्याबद्दल तारीफ करणारे, त्यांच्या मध्यें शारीरिक प्रमाण बद्धता विशेष असते असें म्हणणारे, आणि त्यांच्या गुणांचीहि स्तुति करणारे मला आढळले; पण त्यांनीं त्यांपैकीं एकादी मुलगी वरल्याचें मात्र माझ्या नजरेस पडलें नाहीं ! याला कारण ते पोर्तुगीज पुरुष



पहिल्या महायुद्धाच्या जयस्तंभासमोर
अध्यक्ष व इतर निमंत्रित मंडळी

कीं त्या गोंवेकर ख्रिस्ती मुली तें समजण्याला मागें नाहीं; कदाचित् हिंदी मुलीं-तील स्वाभाविक संकोचच असे संबंध घडून येण्याला कारण असावा असें वाटतें. गोंवेकर ख्रिस्ती समाज अद्यापि 'बामण', 'चारडे', 'सुदीर' इत्यादि आपल्यांतील सामाजिक ज्ञातिभेद अभिमानानें पाळणारा असल्यामुळें त्यांच्यामध्यें जशी एकी वस्तुतः असावी तशी असत नाहीं. गुजराथी, पारशी, आगाखानी मुसलमान, वगैरे इतर हिंदी लोक जे तिकडे आहेत ते एका अर्थी बऱ्या स्थितींत असलेले दिसले; त्यांचें सगळें लक्ष आपल्या व्यापारांत असतें; आणि त्यांचे संबंध ब्रिटीश वसाहतींतील व्यापाऱ्यांशीं असल्यामुळें त्यांचें आर्थिक बलहि मोठें असतें. या कारणामुळेंच हे लोक गोऱ्या वसाहतवाल्यांशीं व्यापा-रांतच नव्हे तर, राजकीय हक्कांकरितांहि लढा देत आहेत. या लढ्यांतील महात्मा गांधींची कामगिरी तर जगजाहीर आहे.

खुद्द लोरेंस मार्क्विस येथें वर्णभेदजन्य लढ्याला अद्यापि प्रत्यक्ष सुरवात झालेली नाहीं; पण तसे वारे वाहूं लागल्याचीं कांहीं चिन्हें मात्र आमच्या नजरेस पडल्याशिवाय राहिली नाहींत.

आम्हांला अध्यक्षसाहेबांबरोबर सुमारें सात दिवस सतत फिरावें लागल्यामुळें या शहराची सर्व व्यवस्था बारिक नजरेनें निरीक्षण करतां आली. नाच, नाटकें, नानातऱ्हेचे करमणुकीचे कार्यक्रम, तसेंच स्वागताप्रित्यर्थ ठिकठिकाणीं होणारे समारंभ इत्यादि सर्व कार्यक्रमांत सकाळीं दहा वाजल्यापासून तों मध्यरात्र होईपर्यंत आम्हांला अध्यक्षांबरोबर भाग घ्यावा लागत असे. या समारंभांपैकीं मागुल येथें झालेला समारंभ फारच प्रेक्षणीय होता. पोर्तुगीज जेव्हां येथें प्रथमच येऊन पोंहचलें त्यावेळी त्यांनीं तेथें आपल्या खुणेचा एक दगड पुरला. त्या दगडास ते 'पाद्रांव' असें म्हणतात. या ठिकाणीं जवळजवळ तीस हजार निग्रो पुरुष, स्त्रिया व मुलें आपल्या हातांत भाले, बर्च्या, शिंगें वगैरें आपल्या पद्धतींचीं शस्त्रास्त्रें घेऊन मशालीच्या उजेडांत रानाच्या उतरणी-वरून खालीं उतरूत येत होते. रणवाद्यांचा आवाज, शस्त्रांचा खडखडाट,

मशालींच्या ज्वाला आणि त्या मंडळींचा कलकलाट, यांनीं ती जागा पाया-खालीं एक सारखी हादरत होती. अरण्यांतून हे लढवय्ये जेव्हां खालीं उतरून येत होते तेव्हां त्यांचें जें दृश्य दिसत होतें तें वर्णन करणें अशक्य आहे. आगीच्या पचंड ज्वाला, स्त्रीपुरुषांनीं आपापल्या पद्धतीप्रमाणें घातलेले गुंजा, शिंपले, शंख इत्यादिकांचे विचित्र दागिने, सर्वांगास फांसलेला तांबडा रंग, त्यांत आणखी डोळ्यांखालीं, छाती, दंड व पाठीचा कणा यांवर ओढलेले पांढरे पट्टे, वाघ, चित्ते, अस्वलें, हरिणें यांचीं अंगावर घेतलेलीं कातडीं, अशा भीषण थाटांत, पण अर्धनग्न स्थितींत हे स्त्रीपुरुष निग्रो युद्धांत किंवा युद्धापूर्वी म्हणावयाचीं त्यांचीं गाणीं मोठमोठ्यानें तालसुरावर ओरडून म्हणत म्हणत, आम्हीं ज्या उच्च स्थंडिलावर बसलों होतों तेथें हळूहळू चालत आले; आणि तो समुदाय आमच्यापासून अवघ्या तीसचाळीस हातांच्या अंतरावर उभा राहिला होता. त्यांच्या अंगाला तेथूनच एक प्रकारची घाण येत होती. परंतु जेव्हां त्यांच्या लुटुपुटूच्या लढाईला प्रत्यक्ष सुरवात झाली तेव्हां त्या घाणीचें भान न रहातां सगळें लक्ष त्यांच्या युद्धविषयक विशिष्ट डावपेचांकडे लागलें. उदयशंकर, रामशंकर यांचें तांडवनृत्य पहात असतांना जी मनाची स्थिति होते, तशीच आतांहि आमची झाली. कांहीं वर्षांमागें गोव्यांत जावा बेटांतील एक मंडळी आली होती. प्रारंभीं ती अग्नीचें कुंड पुढें ठेवून त्यापुढें एक प्रकारचा नाच करीत असे. कांहीं अंशीं तोच प्रकार येथें दिसला. पांचपांच हजार व त्याहूनहि मोठ्या समुदायांमध्यें जेव्हां युद्धास सुरवात झाली, तेव्हां तर त्यांचें तें युद्ध फारच मजेदार झालें. रात्रीं एक वाजतां हा समारंभ आटोपला.

दुसऱ्या दिवशीं आम्हीं सगळें शहर फिरून पहाण्यासाठीं म्हणून बाहेर पडलों. वर लिहिल्याप्रमाणें हें शहर लहान असलें तरी प्रेक्षणीय आहे, यांत शंकाच नाहीं. लोकांच्या रहदारींतील व्यवस्थितपणा व टापटीप, वाहनांची व्यवस्था, ड्रायव्हरांची वागणूक इत्यादि सगळ्या गोष्टी आफ्रिकेंत आम्हीं पाहिलेल्या इतर सगळ्या शहरांपेक्षां कितीतरी पटीनें उच्च दर्जाच्या होत्या. सुखसोईचे



मागूल येथील काळ्या लोकांचा लुटुपुटूच्या लढाईसाठीं जमलेला लढवय्या जमाव

सगळे प्रकार येथें आहेत. शैक्षणिक संस्था आहेत. मेडिकल कॉलेज मात्र येथें नाहीं. गोव्यासारख्या ठिकाणीं तें असून लोरेंस मार्क्विससारख्या ठिकाणीं नसावें याचें नवल वाटलें. शहरापासून बऱ्याच लांब अंतरावर एक ' झू ' बाग असून ती बडोदा किंवा मुंबई शहरांतील बागांप्रमाणेंच बनविली आहे. तिचें क्षेत्रफळ बरेंच विस्तृत आहे. त्यांत बाहेरून खंदक खणून मध्यें हत्ती, वाघ, सिंह इत्यादि भयंकर जनावरें मोकळींच ठेवण्यांत येणार आहेत व तशी योजना आंखण्यांत आलेली आहे असें समजलें. इलेक्ट्रिसिटीचें पावर हाऊस तेथें आहे; पण तें अपुरें असावें असें वाटलें. कारण अध्यक्षांच्या आगमना-प्रित्यर्थ जी रोषणाई केली होती ती त्यामध्यें एक दोन ॲव्हेन्यूमध्येंच काय ती इलेक्ट्रिक दिव्यांनीं केलेली दिसली. इतर ठिकाणीं केवळ मिणमिण उजेडच दिसत होता; कित्येक ठिकाणीं तर गडद अंधार होता. या ठिकाणीं रोषणाई करण्याइतकी वीज उत्पन्न होत नसावी असें उघड दिसलें. अशाच आणखी कांहीं किरकोळ गोष्टी सोडल्या, तर एकंदरींत लोरेंस मार्क्विसची आजची स्थिति बरी आहे असेंच म्हणावें लागतें. आणि हाच विचार मनांत बाळगून आम्ही तेथें तीन आठवडे सुखासमाधानानें घालविले व त्याची आठवण कधीं बुजेल असें वाटत नाहीं.

पुढें लवकरच दर्बानवरून येणारी केनिया बोट मुंबईस जावयाची होती, तिच्यावर आम्हांस पॅसेज मिळून व्यवस्था झाली, व आम्हीं हिंदुस्थानास परतलों.

८०८७९

REFBK-0007879

REFBK-0007879